म. ग्रं. सं. ठाणें
विषय धि २०५।०३
सं. नं. ६५०
१८८३

आणि

म. ग्रं. सं. ठाणें
विषय धिरको
६८
संग्रहालय क्रमांक
६०
लेखक
सन १८८२
पुस्तकाचें नांव प्रार्थनासंग्रह आणि सामाजिक उपासना

सं.नि
३५

उ[०] - ६०

Vinayak Govind
Mande

22-7-97
Poona

V. Mande

(ज्ञानप्रकाशांत ३५)

# प्रार्थनासंग्रह

आणि

# सामाजिक उपासना.

व्यक्तींच्या व सामाजिक उपासनेच्या साहाय्यार्थ केलें

तें

मुंबईंत

इंडियन प्रिंटिंग छापखान्यांत छापिलें.

---

सन १८८३ शके १८०४.

किंमत ४ आणे.

# सूचना.

ह्या पुस्तकाचे प्रार्थनासंग्रह आणि सामाजिक उपासना असे दोन विभाग आहेत. प्रार्थनासंग्रहांतील प्रार्थना निरनिराळ्या प्रसंगास, निरनिराळ्या मनोवृत्तींस, व मनुष्याच्या निरनिराळ्या स्थितीस अनुरूप अशा आहेत. सामाजिक उपासना अनेक भक्तांनीं एकत्र जमून करण्याच्या आहेत. तरी त्या एकेकासही सर्व काळीं उपयोगीं पडण्यासारख्या आहेत. आपण प्रत्यहीं जी ईश्वरोपासना करावयाची ती सामाजिक उपासनेच्या पद्धतीप्रमाणेंच सांग करावी. तींत त्या वेळच्या आपल्या मनाच्या स्थितीप्रमाणें विशेष प्रार्थना जी करणें ती मात्र आपल्या इच्छेप्रमाणें करावी किंवा प्रार्थनासंग्रहांतील कोणती प्रार्थना कोणत्या वृत्तीस अनुरूप आहे हें लक्षांत ठेविलें असतां त्यांतूनही घेतां येण्यासारखी आहे. कदाचित् सांग उपासनेस वेळच नसेल तर त्यावेळीं निदान प्रार्थनासंग्रहांतील प्रार्थना तरी वाचावी. निरनिराळ्या प्रसंगांकरितां ह्मणजे, प्रातःकालीं, भोजनकालीं, शयनकालीं, करण्याच्या ज्या प्रार्थना आहेत

त्यांचा त्या त्या वेळीं उपयोग करावा किंवा आपल्यास त्यावेळीं वाटेल त्याप्रकारें प्रार्थना करावी.

लेखी प्रार्थनेच्या संबंधानें सामान्यतः एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, मनुष्य ज्यावेळेस प्रार्थना करावयास बसतें त्यावेळेच्या त्याच्या अंतःकरणाच्या भावनेस अनुसरून निघणारे जे त्याचे उद्गार ती त्याची खरी प्रार्थना होय. अंतः-करणाच्या भावना सदा सर्वकाळ सारख्याच असतात असें नाहीं. कित्येक भावना सर्वकाळ जागृत असतात व कित्येक कांहीं कांहीं प्रसंगींच जागृत होतात; तेव्हां अर्थातच मनुष्या-च्या निरनिराळ्या वेळेच्या प्रार्थनाही निरनिराळ्याच असल्या पाहिजेत. ही गोष्ट लक्षांत आगली ह्मणजे पूर्वी आपण किंवा दुसऱ्यानें लिहून ठेवलेली प्रार्थना आपण वाचणें हा गौण पक्ष होय हें उघड आहे. वास्तविक ह्मटलें ह्मणजे प्रत्येक वेळीं ज्याची त्याणें आपल्या चित्तवृत्तीस अनुसरून प्रा-र्थना करावी हें योग्य होय. पण हें ज्यांच्या हातून घडत नसेल त्यांस कांहीं साहाय्य व्हावें ह्मणून हें पुस्तक केलें आहे. ह्याचा उपयोग करणारानें ह्यांतील सर्व प्रार्थना एकवेळ वाचू-न ठेवून कोणती प्रार्थना कोणत्या वृत्तीस अनुसरून आहे हें वर सांगितल्याप्रमाणें लक्षांत ठेवावें किंवा तिजवर आपली

रं.नाके



कांहीं खूण करून ठेवावी आणि प्रार्थना करतेवेळीं आपल्यास जी प्रार्थना योग्य वाटेल ती त्याणें त्यावेळीं वाचावी. ह्याशिवाय त्यावेळीं त्यास कांहीं विशेष प्रार्थना करावीशी वाटल्यास तीही करावी.

नित्याच्या संसाराच्या व्यवसायांतून निघून एकदम प्रार्थनेस बसल्यास चित्त लवकर एकाग्र होत नाहीं; याजकरितां प्रार्थनेपूर्वी कांहीं ईश्वरस्तवनपर पद्यें गाणें हें फार उपयुक्त आहे, ह्मणून तीं गात जावीं, व तींही प्रार्थनेप्रमाणेंच निवडून घेत जावीं. प्रार्थनेनंतरही कांहीं पद्यें गाणें योग्य आहे. पद्यांचें प्रार्थनासंगीत ह्या नांवाचें पुस्तक प्रसिद्धच आहे.

प्रार्थनेच्यावेळीं चित्त एकाग्र होण्यास स्थल व वेळ हींही अनुकूल असावीं लागतात. स्थल जितकें निवांत, स्वच्छ, व रमणीय असेल तितकें चांगलें. नित्याच्या प्रार्थनेच्यावेळीं कांहीं कारणानें मन फार व्यग्र झालें असलें किंवा असावी तितकी फुरसत नसली, तर अशा वेळीं प्रार्थना न करितां त्या दिवशीं दुसऱ्या सोईच्यावेळीं ती करावी हें बरें. प्रातःकाळीं स्नानानंतर व रात्रीं निजावयाच्यापूर्वी ह्या वेळा साधारणतः सोईच्या आहेत.

स्त्रियांकरितां ह्मणून कांहीं प्रार्थना घातल्या आहेत. पण पुरुषांकरितां ज्या प्रार्थना आहेत त्यांतील पुरुषवाचक अशीं

जीं शब्दांचीं रूपें आहेत तीं फिरवून स्त्रीवाचक केल्यास व दुसरा कांहीं थोडा फेरफार केल्यास त्याही प्रार्थना स्त्रियांच्या उपयोगी पडतील, व त्याचप्रमाणें स्त्रियांच्या कित्येक प्रार्थना पुरुषांस घेतां येतील.

मुलांकरितां व स्त्रियांकरितां दिलेल्या प्रार्थना त्यांस पूर्णपणें समजत नाहींत, असें वाटल्यास त्या त्यांणीं प्रथम कोणापासून नीट समजून घ्याव्या आणि मग त्या वाचीत जाव्या. ह्या पुस्तकांतील कित्येक शब्द स्त्रियांस व मुलांस समजणार नाहींत असें वाटलें ह्मणून त्यांच्याकरितां अशा कठीण शब्दांचा कोश शेवटीं दिला आहे.

ह्या पुस्तकांतील सामाजिक उपासनांपैकीं पहिली उपासना परमेश्वराच्या आराधनेचा प्रकार ह्या नांवाच्या पुस्तकांतून घेतली आहे; प्रार्थनासंग्रहांतील कांहीं प्रार्थना व सामाजिक उपासनांमधील चवथी उपासना अशा धर्मशिक्षा ह्या पुस्तकांतून घेतल्या आहेत; व प्रार्थनासंग्रहांतील ११ वी प्रार्थना गुजराथी बालसंध्योपासना ह्या पुस्तकाच्या आधारानें लिहिली आहे. बाकी सर्व नव्या रचलेल्या आहेत.

# ईश्वरोपासना.

---

ह्या सर्व जगताचा उत्पन्नकर्ता, त्याचा शास्ता, आणि पालक जो सर्वसमर्थ मायबाप त्याची प्रत्यहीं उपासना करणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य होय. परमेश्वराच्या उपासनेचीं उद्बोधन, स्तवन, ध्यान आणि प्रार्थना अशीं चार अंगें आहेत. सर्वकाळ प्रापंचिक व्यवहारांत मन गुंतलेलें असल्यामुळें तें परमेश्वराविषयीं विचार करण्यास योग्य नसतें, त्यास प्रापंचिक व्यवसायांतून काढून ईश्वरोपासनेस योग्य करणें हें उद्बोधन. परमेश्वराचे नित्य आणि परमावधिक असे जे धर्म त्यांच्या मननाच्या योगें उत्पन्न होणारी जी अनन्यभावेंकरून प्रीति व पूज्यबुद्धि तिचें प्रदर्शन करणें व तो अमर्याद कारुण्य व स्नेह यांच्या योगें आमचें शरीर व आत्मा यांचें रक्षण करितो अशी आपली मति झाली असतां त्याजविषयीं सहज उत्पन्न होणारी जी कृतज्ञताबुद्धि तिचें प्रदर्शन करणें हें स्तवन. ध्यान ह्मणजे सर्वव्यापकत्व, सर्वज्ञत्व, अनन्तशक्तिमत्व, परम कारुणिकत्व आणि शुद्धत्व हे जे त्याचे धर्म त्यांचें मनन करून ज्ञानचक्षूंनीं त्याला साक्षात् पाहाणें. आमची वृत्ति शांत कर, आमचा आत्मा विमल राख, पापापासून आह्मांस मुक्त कर असें त्याजपाशीं मागणें ह्याला प्रार्थना

ह्मणावें. हीं चारही अंगें यथायोग्य रीतीनें एकत्र मीलित असलीं ह्मणजे परमात्म्याची वास्तविक उपासना होते.

आमची ईश्वराविषयीं पूज्यत्वबुद्धि व खरा कृतज्ञताभाव हीं अंतःकरणामध्यें जागृत होऊन त्यांच्या अन्वयें योग्य वर्तन झालें आणि ईश्वर आपल्या सन्निध वास करीत आहे असा साक्षात् अनुभव होण्याची उत्कंठापूर्वक इच्छाही पूर्ण झाली आणि आपला उद्धार व्हावा ही इच्छा सफळ झाली ह्मणजे ह्या प्रकारच्या आराधनेचा उद्देश सिद्धीस गेला असें समजावें. ह्या चार मनोधर्मांतून कांहीं एकाचें प्राबल्य असून इतरांचा अभाव अथवा कमतीपणा असतो असें कित्येक प्रसंगीं घडतें; उदाहरण, अकस्मात् अचिंतित असा आपणास कांहीं लाभ झाला ह्मणजे कृतज्ञताबुद्धि प्रवृत्त होते, किंवा दुःख आणि यातना प्राप्त झाल्या ह्मणजे दृढ भावानें ईश्वराचा आह्मी धांवा ह्मणजे प्रार्थना करितों. अशा रीतीनें प्रसंगानुसार मनोवृत्ति प्रज्वलित होणें हें स्वाभाविकच आहे आणि तिचा निरोध केला ह्मणजे बहुधा वाईट फळ होतें. परंतु साधारण उपासना चारही अंगांनीं परिपूर्ण अशी असली पाहिजे, ह्मणजे तेणेंकरून आपल्या अंतःकरणाचे सर्व प्रकारचे भाव प्रज्वलित होऊन समाधान होतें.

# प्रार्थनासंग्रह.

## प्रातःकाळच्या प्रार्थना.

### प्रार्थना १ ली.

(निजून उठल्यावर करावयाची).

श्लोक.

लोकेश चैतन्यमयाधिदेव मांगल्य विष्णो भवदाज्ञयैव ॥
हिताय लोकस्य तव प्रियार्थं संसारयात्रामनुवर्तयिष्ये ॥१॥

अर्थ— हे जगदीश्वर, हे चैतन्यमय परमेश्वर, मंगलमय, सर्वव्यापक प्रभो, तुझ्याच आज्ञेनें लोकहितार्थ आणि तव प्रीत्यर्थ मी आतां प्रपंचकृत्यांस प्रवृत्त होतों.

हे जीवनदात्या प्रभो, तुझ्या परमकृपेनें रात्रीच्या सुखदायक निद्रेंतून मी जागृत झालों आहें; आणि आतां दिवसाचे व्यवसाय करण्यास प्रवृत्त होणार; तेव्हां अशा समयीं तुजसमोर येऊन तुझें दर्शन घ्यावें आणि तुझी प्रार्थना करावी हें मला अवश्य आहे. तुझ्या कृपेनें जी मला निद्रा प्राप्त झाली तेणेंकरून कालच्या उद्योगापासून झालेले श्रम दूर

होऊन आजचे उद्योगधंदे करण्यास मला उमेद व हुशारी आली आहे. मी अयोग्य वर्तन करून, पाप संचित करावें, अशी तुझी इच्छा नाहीं परंतु पुण्याचरण करून पापनिवृत्त होत्साता, ज्या गोष्टींनीं माझ्या ऐहिक व पारमार्थिक सुखाची वृद्धि होईल त्याच गोष्टी मी आचराव्या असा तुझा हेतु आहे. तर हे सर्वसमर्थ परमेश्वर, तुझ्या प्रबल शक्तीनें ह्या दिवशीं मी कोणत्याही पापांत अथवा संकटांत पडणार नाहीं असें तूं कर. ज्या माझ्या कृत्यांनीं तुला संतोष होईल, तींच करण्याची माझी आज बुद्धि असूं दे, ही तुझेजवळ माझी अनन्यभावें प्रार्थना आहे.

---

## प्रार्थना २ री.

हे भगवन्, हा नूतन दिवस उगवला आहे. ह्या दिवसांत मला जे जे सुखाचे व आनंदाचे तसेच दुःखाचे व संकटाचे प्रसंग येतील, त्या सर्व वेळीं मी तुझ्याच आश्रयानें असावें. ह्या सर्व दिवसांत मी जें जें करीन तें तें तुझ्या प्रीत्यर्थ मी करावें, ह्यासाठीं माझ्या अंतःकरणांत तुजविषयीं प्रेम उत्पन्न होवो. तूं जो मार्ग मला लावून दिला असशील त्याच मार्गानें मी निश्चयानें चालून, त्या मार्गानें जात असतां मला जे

कष्ट होतील ते सहन करण्याची शक्ति दे. तूं ह्या दिवसांत माझ्या अंतःकरणांत वास कर आणि सुखांत तसेंच दुःखांत मी तुझा स्तव व प्रार्थना करावी अशी मला बुद्धि दे.

---

## प्रार्थना ३ री.

हे सर्वव्यापी भगवन्, मी तुझ्या कृपेनें हा नूतन दिवस पहात आहें, याबद्दल मी तुझा फार उपकारी आहें. आमचा उत्पन्नकर्ता तूंच आहेस आणि प्रत्यहीं जें नवें नवें सामर्थ्य आह्मांस प्राप्त होतें, तें तुझ्याच कृपेनें होतें. याजकरितां भगवन्, हें जीवित माझें नव्हे तर तुझेंच आहे असें मला सतत वाटूं दे. आजच्या ह्या दिवसांत मी तुझ्या आज्ञेप्रमाणें निश्चयानें वर्तन करावें अशी तूं कृपा कर. माझें अंतःकरण प्रेमभरित होवो. तूं जो आमचा पिता त्या तुझ्या इच्छेवर दृष्टि देऊन व तुझ्या पवित्र आज्ञा मान्य करून ह्या बालकानें रहावें असें कर. तूं आह्मांस जे नियम लावून दिले आहेस त्यांपैकीं कोणताही नियम माझ्या लक्षांत आला असतां मी आपली स्वार्थबुद्धि व मनाची अनावर ओढ ह्यांस एकीकडे ठेवून तुझ्या नियमांस शिरसावंद्य करावें असें कर.

---

# विविध मनोवृत्तींस अनुसरून प्रार्थना.

## प्रार्थना १.

नित्यं शुद्धं निराभासं निराकारं निरंजनं ।
नित्यबोधचिदानंदं तं सर्वेशं नमाम्यहं ॥

हे परमात्मन्, तूं नित्य आहेस; तूं शांतस्वरूप आहेस. तुला अनन्यभावानें शरण आलें असतां चित्ताची शांति होते आणि इहलोकीं व परलोकीं सुख प्राप्त होतें असा आमचा पूर्ण विश्वास आहे. परंतु आमचें चित्त रात्रंदिवस नानाप्रकारच्या विषयांत निमग्न होऊन आह्मी तुला सर्व प्रकारें विसरून जातों याकरितां हें जें आमचें अत्यंत विषयासक्त अंतःकरण तें आपल्या गूढ व विलक्षण सामर्थ्याच्या योगें आपल्याकडेस ओढून घे, आणि तुझें ध्यान, भजन, स्तवन व प्रार्थना हीं कशीं करावीं हें आह्मांस शिकीव. तुझ्या कृपेविणें ही गोष्ट केवळ आमच्या सामर्थ्यानें आह्मांस सर्वथा साध्य नाहीं हें आमच्या प्रत्ययास आलें आहे. अतएव जगदात्मन्, तूंच होऊन ही अत्यंत विषयासक्ति नाहींशी करून आमचा मायबाप जो तूं त्या तुजप्रत येण्याच्या मार्गास आह्मी लागूं असें कर.

## प्रार्थना २.

अज्ञानतिमिरांधस्य ज्ञानांजनशलाकया ॥
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै विश्वात्मने नमः ॥

पहाणारा जो आहे त्याला तुझें रम्य, आनंदमय, मंगल, सत्यमय, वत्सल असें स्वरूप बाह्य विश्वामध्यें, अंतःकरणामध्यें आणि मनुष्यांचा जो युगानुयुग चालत आलेला व्यवहार त्यामध्यें अति सोज्वळपणें दृश्यमान होतें आणि त्या मनुष्याच्या अंतःकरणांत ह्या दुःखरूप प्रपंचामध्यें धैर्य, आनंद आणि शांति हीं वास करितात. परंतु हें तुला पहाण्याचें सामर्थ्य आह्मांमधून नष्ट झालें आहे. आणि तूं वत्सल मायबाप आमच्या सन्निध असून, बालकास भिंतीच्या आड राहिलेली माता जशी दिसत नाहीं तशाप्रकारें दिसत नाहींसा होऊन आह्मी शोकाक्रांत होतों आणि अशाचमुळें आह्मीं सत्य आणि मंगलमय जो मार्ग तो सोडून असत्य आणि पापी अशा मार्गाचें अवलंबन करितों. तर याप्रकारें अज्ञानरूप तिमिरानें वेष्टित असे जे आमचे चक्षु त्यांस ज्ञानरूप अंजनाच्या शलाकेनें स्वच्छ कर आणि आह्मांस सर्वत्र तूं दिसशील असें कर.

---

## प्रार्थना ३.

### अभंग.

ठाकलोंसें द्वारीं । उभा याचक भिकारी ॥ १ ॥
मज भीक कांहीं देवा । प्रेमभातुकें पाठवा ॥ २ ॥

हे देवा, मी दीन रंक आहें; मी भिकारी आहें; माझ्या हृदयांत प्रेमाचा लवलेशही नाहीं, ह्मणून तुझ्या दारीं भिक्षा मागावयास आलों आहें. मी फार वेळ उभा राहिलों आहें, मजवर कृपा करून मला प्रेमाची कांहीं भिक्षा घाल. बाह्य विषयांच्या गोडींत चित्त इतकें निमग्न झालें आहे, कीं तुझी मला आठवणही होत नाहीं. वाचेनें तुझें नाम उच्चारितों, कानांनीं तुझे गुण ऐकतों, भक्तांनीं केलेलीं तुझीं स्तोत्रें पाठ करितों, परंतु अंतःकरण प्रेमयुक्त होत नाहीं, मन तुझ्या ध्यानीं तल्लीन होत नाहीं, तुझ्या भेटीसाठीं आतुर होत नाहीं, तुझ्या भेटीनें आनंदित होत नाहीं. तुझे प्रेमळ भक्त तुझे गुण गाऊं लागले असतां त्यांचें अंतःकरण प्रेमानें भरून जातें, त्यांचीं मुखें प्रेमानें प्रफुल्लित होतात; त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागतात; त्यांस तुझा समागम झाला ह्मणजे दुसऱ्या कशाचें-ही भान रहात नाहीं; प्रेमरस अनुभवीत असतां त्यापुढें धन-

द्रव्य, मानप्रतिष्ठा, सर्व कांहीं बाह्य ऐश्वर्य तुच्छ वाटतें; परंतु मी दरिद्री, मजजवळ प्रेम नाहीं, माझें हृदय विषयलोभानें भक्तीविषयीं पाषाणासारिखें कठीण झालें आहे, तुझी अनंत कृपा पाहूनही माझ्या चित्तास द्रव येत नाहीं; आपल्या पातकांचें स्मरण झालें ह्मणजे मी तुला भयानें हाका मारितों, परंतु चित्त कळवळावें तसें कळवळत नाहीं; विचाराअंतीं तूंच मला सर्व कांहीं आहेस असें वाटतें, परंतु तुझ्या ठायीं प्रीति जडत नाहीं; बाह्य विषय मनाला ओढून घेतात, त्यांच्या ठिकाणीं सर्व प्रीति अर्पण झाली आहे. क्षणिक सुखांत मन गुंगलें आहे, यामुळें खऱ्या सुखाला कारण जें तुझ्या ठायीं प्रेम तें मला प्राप्त होत नाहीं. ह्मणून मी प्रेमाचा भुकेला याचक तुजपाशीं आलों आहें. आतां तरी तुझ्या ठायीं माझें मन जडूं दे, या कठीण हृदयास द्रव येऊन त्यांतून प्रेमाचा पाझर सुटूं दे, आणि माझा जीव अखंड प्रेमानंदाचा अनुभव घेऊंदे.

---

### प्रार्थना ४.

पतीतपावना । दीनानाथा नारायणा ॥ १ ॥
तुझें रूप माझे मनीं । राहो नाम जपो वाणी ॥२॥

हे दीनदयाळा देवा, आह्मां जीवांनां तुजवांचून कोण आ-

श्रयदाता आहे? आह्मी दुर्बल, पापविचारांनीं, पापवासनांनीं आणि पापाचरणांनीं पतित झालों आहों, या पापापासून आह्मांस कोण सोडवील? आह्मी अमंगळ झालों आहों, आह्मांस कोण शुद्ध करील? पतितांस पावन करणारा तूंच एक समर्थ आहेस, आह्मी पापाच्या प्रवाहांत वाहात चाललों आहों, आह्मी दीन, अनाथ, आह्मांस यांतून कोण बाहेर काढील? तूं दीनांचा त्राता आहेस, तूं दीनांचा सखा आहेस, तूं दीनदयाळ आहेस, असें साधुजन आपल्या अनुभवानें आह्मांस सांगतात, त्यावर विश्वास ठेवून आह्मी तुला शरण आलों आहों. तूं सर्व विश्वाचा धनी, आह्मीं तुजवांचून कोणाकडे जावें? जे तुझी भक्ति करितात, त्यांचा तूं प्रतिपाळ करितोस, ह्मणून भावेंकरून आह्मी तुला विनवितों. तूं आमच्या प्राणांचा रक्षणकर्ता, तूं सर्वसमर्थ, आमचें संकट दूर कर. आमचें मन सदां तुझ्या स्वरूपीं लीन होऊन राहील असें कर. आणि आमची वाणी आनंदानें तुझीं नामें गावो, अशी कृपा आह्मांवर होऊं दे.

---

## प्रार्थना ५.

आतां घेई माझें । भार सकळही ओझें ॥
काय करिशी होई वाड । आलों पोटाशीं दगड ॥

तूंचि डोळे याती । होई दीपक सांगातीं ॥
तुका ह्मणे कांहीं । विचाराया चाड नाहीं ॥ १ ॥

हे दयाळू देवा, या संसारांतील मोहपाशांत मी पडलों आहें. कामक्रोधादिक प्रबळ विकारांच्या योगानें अगदीं पराजित होऊन कर्तव्याच्या भारानें मी वांकलों आहें. हें माझें ओझें तुजवांचून कोण उतरील ? माझें कर्तव्य इतकें मोठें आहे, आणि मी इतका दुर्बळ झालों आहें कीं माझ्यानें त्यांतून थोडासा अंश देखील होत नाहीं. अशा प्रसंगीं मला तुजवांचून कोण साह्य करील ? माझा भार कोण उतरील ? हे पित्या, तुझीं दुसरीं लेंकरें सतत तुझी आज्ञा परिपालन करून तुझे मंगल हेतु सिद्धीस नेतात. तूं दिलेल्या बुद्धीचा आणि शक्तीचा चांगला उपयोग करून तुजवर भार न घालतां कृतार्थ होतात. परंतु मी तुझें अज्ञान लेंकरूं, तुझें ह्मणवून तुझें अपेक्षित कार्य करण्यास समर्थ होत नाहीं, तूं दिलेल्या बुद्धीचाही उपयोग चांगला करूं शकत नाहीं, ह्मणून एखादें दुर्बळ बालक जसें सर्व प्रकारें आपल्या मातापितरांवर अवलंबून रहातें, तसा सर्व प्रकारें मी तुजवर अवलंबून आहें. माझें खरें कल्याण कोणतें तें मला कळत नाहीं तें कळण्यास मला ज्ञानाचें साधन नाहीं. तें प्राप्त करून घेण्याचा मार्ग

मला दिसत नाहीं व तो मार्ग दाखविणारा वाटाड्याही कोणी ह्या जगांत दिसत नाहीं. तस्मात् हे देवा, तूंच माझा वाटाड्या हो, तूंच माझी ज्ञानजोति पाजळून माझा वास्तविक कल्याणाचा मार्ग मला दाखीव. आणि मला त्या मार्गांत आपल्या संगतीचा लाभ देऊन ज्या स्थानीं गेलें असतां पुन: पतन होणार नाहीं व तुझ्या भेटीस अंतर पडणार नाहीं अशा स्थानीं मला तूं नेऊन ठेव. माझ्या दोषांचा मी विचार केला ह्मणजे मला कांहींच सुचेनासें होतें. तूं पतीतपावन, सर्व दोष हरण करणारा आहेस. तुझ्या कृपादृष्टीनें माझा सर्व पापमळ नष्ट होऊन तुझ्या संबंधास उचित असें मी पवित्र लेंकरूं होईन असें कृपा करून कर.

---

## प्रार्थना ६.

आतां माझ्या भावा । अंतराय नको देवा ।
आलें भागा तें करीतों । तुझें नाम उच्चारितों ।
दृढ माझें मन । येथ राखावें बांधोन ।
तुका ह्मणे वाटे । नको फुटों देऊं फांटे ॥ १ ॥

हे मायबापा, लहानपणच्या अज्ञानामुळें, संसारांतील अनेक व्यवसायांमुळें, व अनेक मतांच्या घोटाळ्यामुळें मला ह्या ज-

गांत तुझ्या अस्तित्वाचें भान बहुत दिवस नव्हतें. नानाप्रकारच्या तर्कवितर्कांनीं मन व्यग्र होऊन संशयजालांत पडलें होतें. कोठेंच आश्रय दिसेनासा झाला होता. मनास सत्य असें कांहींच वाटेनासें झालें होतें. ह्या जगाची उत्पत्ति कशी होते, स्थिति कशी होते, व ह्याचें पर्यवसान कोणीकडे, ह्याला कोणी वर्तविता आहे कीं नाहीं, मरणानंतर आपली काय गति होणार किंवा आपला सर्वथैव नाश होणार, इत्यादिक गोष्टींचें निश्चित ज्ञान होणें शक्य नाहीं, असा मनाचा निर्धार होऊन तें उदासीन झालें होतें, अंतःकरणावर आंधेरी आली होती, व ह्या स्थितींत माझा जीव अतिशय तळमळत होता. परंतु धन्य तुझी लीला देवा, अनुपम तुझी करुणा, अशा तुला विसरणाऱ्या अधम जीवाचाही क्लेश दूर करून त्यास कल्याणाच्या मार्गी लावण्याचा तुझा जो मंगल हेतु व तदर्थ ज्या तुझ्या अतर्क्य युक्ति त्याही धन्य होत. अशा उदासीन अवस्थेमध्यें आपल्या कांहीं आज्ञांकित लेंकरांचीं, आपल्या प्रेमळ भक्तांचीं, कळवळ्याचीं वचनें, मज दीनास तूंच वाचावयास व ऐकावयास कळविलेंस आणि त्यांच्या त्या बोधज्योतीचा प्रकाश माझ्या अंतःकरणावर पाडून, मला आपल्या स्वरूपाची व त्याच्या प्रेमळ भक्तीची ओळख करून दिलीस आणि आपल्या

अस्तित्वाविषयीं, कर्तृत्वाविषयीं, पूज्यत्वाविषयीं माझ्या शून्य अंतःकरणांत भाव उत्पन्न केलास, आणि पुष्कळ दिवसांची तळमळ नाहींशी करून नानाविध संशयांचें जाळें तोडून टाकिलेंस. तूं परम दयाळू मायबाप प्रेमदृष्टीनें मजकडे पाहून अमृतप्राय वरदहस्त माझ्या मस्तकीं ठेऊन मला असें ह्मणतोस, लेंकरा, तूं आज पुष्कळ दिवस मजपासून दूर भटकत होतास व तेणेंकरून फार व्याकूळ झाला होतास तो पुनः मजपाशीं आलास तेणेंकरून मी फार संतुष्ट झालों आहें, आतां स्वस्थ ऐस, भिऊं नको; तुला काय पाहिजे असेल तें निःशंकपणें मजपाशीं माग. तर आतां देवा मी तुजपाशीं काय मागूं? तूं मला भावरूप दृष्टि देऊन आपलें प्रेममय दर्शन दिलेंस, आपलें अमृतमय स्वरूप दाखविलेंस तेणेंकरून मी कृतार्थ झालों. आतां माझें मागणें इतकेंच आहे कीं हा जो तुझ्या ठायीं माझे चित्तांत भाव उत्पन्न झाला आहे हा सतत दृढ राहो. कोणत्याही प्रापंचिक व्यावृत्तीनें यास अंतराय न होवो. आतां सतत तूं माझ्याजवळ आहेस. मी तुझीं मधुर नामें उच्चारून तुला हांका माराव्या आणि ऐहिक व्यवसायांच्या पटलाआड तूं झालास तरी लागलेंच पुनः तुजपाशीं यावें. मनाची ओढ सतत तुजकडे असावी. तूं जी कल्याणाची वाट दाखविली

आहेस ती सोडून क्षणमात्रही मी जाऊं नये. या वाटेच्या दोहीं बाजूंस दिसण्यामध्यें फार सुंदर व मोहक; परंतु परिणामीं नाशकारक अशीं ऐहिक फळें वृक्षांवर ओथंबलेलीं दिसताहेत. वाट सोडून तीं घ्यावयास जावेंसें वारंवार वाटतें. परंतु ह्या वाटेस अशाप्रकारचे फांटे फुटूं देऊं नको. तुझ्या बोटाकडे नजर देऊन तुजवरून दृष्टि न काढतां मी तुजसन्निध येऊन पोंचेन आणि तुझ्याठायीं शाश्वत निष्ठा पावेन असें कर. ह्याहून श्रेयस्कर काय आहे?

---

## प्रार्थना ७.

ही पृथ्वी, हें आकाशमंडल, हे पर्वत, हा समुद्र, हें सुंदर, रम्य आणि शोभिवंत असें विश्व पाहून माझा आत्मा उल्लसित होतो. अनादि, अनंत, शांत, आनंदमय, असा जो तूं परमात्मा, तो माझ्या डोळ्यांपुढें उभा आहेस, अशा प्रकारचा प्रत्यय होऊन, अंतःकरण आनंदानें आणि औत्सुक्यानें परिपूर्ण असें होतें. अंतःकरणापुढें शाश्वत, आनंदमय, अनंत असा लोक येऊन उभा रहातो, आणि माझी वृत्ति तल्लीन होते. याप्रकारेंकरून, आपल्या अवर्णनीय स्वरूपाचें ज्ञान होऊन मनुष्य हा क्षुद्ररूपी प्राणी राहूं नये तर त्याला

उत्तरोत्तर उन्नति प्राप्त व्हावी एतदर्थ योजना चोहींकडे परमात्मन् तूं केली आहेस. अंतःकरणाच्या ठायीं सत्याविषयीं जें ज्ञान होण्याचें सामर्थ्य ठेविलें आहेस, ज्याच्या योगें सत्य जें तें सतत शाश्वत सत्यच आहे त्याचा कसाही प्रसंग आला तथापि अतिक्रम होतांच नये असा अंतःकरणाचा प्रत्यय होतो, त्या सामर्थ्याच्या योगेंकरून शाश्वत सत्यस्वरूप जो तूं तोही हृदयापुढें उभा रहातोस. मनुष्याच्या व्यवहारामध्यें नानाप्रकारचीं पापें, दुष्कर्में, चाललीं आहेत, अशा प्रसंगीं त्यांचा तिटकारा येऊन सत्य, योग्य, शुभ, मंगलमय, असें जें कांहीं आहे त्याचें ज्ञान स्पष्टपणें अंतःकरणांत उत्पन्न होऊन त्याविषयीं पूज्यबुद्धि उदित होते, तद्वाराही शाश्वत सत्यस्वरूप मंगलस्वरूप तूं प्रत्यक्ष ह्या अंतःकरणास गोचर होतोस. आपल्या इष्टमित्रांवर अपत्यांवर, मातापितरांवर जें साहाजिक रीत्या निःसीम प्रेम अंतःकरणांत उदित होतें, ज्याच्या योगानें कितीही ऐहिक प्रकारें आपला नाश झाला तथापि मनुष्य त्याची गणना करीत नाहीं, तद्वारा प्रेम हें शाश्वत, अबाधित असें अति उन्नत तत्व विश्वाच्याठायीं नांदत आहे असा प्रत्यय होऊन आणि ह्या सर्व बाह्य विश्वाची रम्य स्थिति पाहून जगताचा आत्मा जो तूं तो माझा परम वत्सल पिता आहेस, याप्रमाणें

साहजिक ज्ञान माझ्या अंतःकरणामध्यें उदित होतें. अशा अनेक प्रसंगीं ह्या प्रकारची जी विलक्षण अंतःकरणाची वृत्ति होते तिचा साक्षात् मी अनुभव घेतों, तिजविषयीं किमपि संदेह नाहीं. ह्याप्रमाणें आपल्या अनादि अनंत, शाश्वत, आनंदमय, परमपवित्र, मंगलमय, परमवत्सल, प्रेमळ स्वरूपाचें ज्ञान साहजिक रीतीनें मनुष्यास व्हावें एतदर्थ तूं विविध योजना केल्या आहेस, परंतु त्या सर्व तुझ्या योजना आह्मी फुकट घालवितों. कामक्रोधादिकांच्या स्वाधीन होऊन, विषयांच्या ठायीं आसक्त होऊन ज्या अंतःकरणांतील तत्वाच्या योगेंकरून या मृत्युलोकाचा स्वर्गलोक होण्याचा संभव आहे, ज्याच्या योगेंकरून क्षुद्र आत्मा हा अत्यंत मोठ्या योग्यतेस पावण्याचा संभव आहे, ज्याच्या योगेंकरून अशा प्रकारची शांति, अशा प्रकारचा आनंद प्राप्त होण्याचा संभव आहे कीं त्यापुढें सर्व पृथ्वीच्या ऐश्वर्यानें होणारा आनंद तुच्छ आहे तें अमोल्य तत्व आह्मी सर्वथा व्यर्थ घालवितों. अमोल्य रत्न सांपडलें असून, त्याची किंमत आह्मांस समजत असून, उन्मत्ताप्रमाणें आह्मी फेंकून देतों. ह्याप्रमाणें परम शोचनीय दशेप्रत पावलों आहों. तर ज्यापेक्षां हा दीन आत्मा उन्नत दशेस पोंचावा असा तुझा उद्देश तुझ्या योजनांच्या योगेंकरून स्पष्ट दिसून येतो, आणि

ज्यापेक्षां निःसंशय तूं ह्या आत्म्याचा वत्सल मायबाप आहेस, त्यापेक्षां ह्या स्थितींतून ह्या दीनाचा उद्धार कर. ही जी दुर्निवार विषयासक्ति, हें जें कामक्रोधांविषयीं दास्य, यांतून सोडवून तें अंतःकरणांतील दिव्य तत्व विकसित होईल आणि तद्योगें सर्व सृष्टीमध्यें, अंतःकरणामध्यें, मनुष्याच्या व्यवहारामध्यें, तुझें स्वरूप दिसून तुझ्याठायीं हा आत्मा निमग्न राहील, सर्व आपलीं ऐहिक कर्तव्यें तुजकडे दृष्टि लावून तुझी इच्छा मनामध्यें आणून तदनुरूप करीत जाईल असें कर.

---

## प्रार्थना ८.

हे जगदात्मन्, दयामय, मायबाप, या अंतःकरणाची दुर्बलता परम मोठी आहे. तिजविषयीं विचार करितों तेव्हां मजला अत्यंत क्लेश होतो. यत्किंचित् प्रपंचामध्यें संकट उपस्थित झालें असतां, दुःख प्राप्त झालें असतां, अंतःकरण धैर्य सोडून, विवेक सोडून विव्हळ होतें. त्या गोष्टीची माझी मजलाच लज्जा वाटते. तुजविषयीं अंतःकरणामध्यें श्रद्धा दृढ नाहीं. ती जर दृढ असती तर अशा प्रकारें ह्या संकटास मी भ्यालों नसतों व दुःखानें विव्हळ झालों नसतों. ब्रह्मांडाचा नायक, सर्वांवर राज्य करणारा जो तूं तो माझा मायबाप, वत्सल मायबाप,

ही गोष्ट स्पष्टपणें जर अंतःकरणांत सतत वागती, तर सर्व प्रकारची भीति नाहींशी झाली असती, संकट हें किमपि संकटसें वाटलें नसतें, आणि दुःखाच्या ठायीं अंतःकरण शांत राहिलें असतें. दुर्घट प्रसंगींही अंतःकरणांत धैर्य आणि शांति निश्चलपणें राहिली असती. परंतु माझी श्रद्धा ही केवळ शाब्दिक, तुजविषयीं मोठमोठाले उच्च वाद करितों, परंतु खरी श्रद्धा, खरा भरंवसा अंतःकरणांत नांदत नाहीं. अत्यंत क्लेशकारक ही गोष्ट आहे. तस्मात् मायबाप, अशा ह्या विलक्षण स्थितींत मजला ठेवूं नको. तुजविषयीं श्रद्धा मनुष्यास साहजिक आहे, परंतु ही गोष्ट माझ्या प्रत्ययास येत नाहीं. तद्विषयीं जें अंतःकरणाचें सामर्थ्य, तें नष्टप्राय झालें आहे, आणि मातापितरांशिवाय अरण्यामध्यें भ्रमण करणाऱ्या बालकाप्रमाणें माझी दशा झाली आहे. तर देवा, ही गोष्ट उचित काय? सर्वसमर्थ मायबाप तूं सर्वत्र असून, माझी दशा अशी व्हावी काय? तस्मात् दयामय, करूणामय, जगदीश्वर माझ्या अंतःकरणास गोचर हो. तुजविषयीं दृढ श्रद्धा अंतःकरणांत सतत वास करो, आणि तिच्या योगें कितीही संकट प्राप्त झालें, कितीही दुर्घट प्रसंग उपस्थित झाला, कितीही दुःखाचे डोंगर कोसळले, तथापि अंतःकरण डगमगणार नाहीं; शांत आणि स्थिर राहील, असें

कर; आणि त्या संकटांतून पार पडण्याविषयीं प्रयत्न करण्याचें सामर्थ्य आणि धैर्य दे.

---

## प्रार्थना ९.

जगदात्मन्, किती अधम मी आहें? किती दुर्बल आहें? अंतःकरणामध्यें दुर्वासना क्षणभर सुद्धां राहूं नये, पाप आपणाकडून घडूं नये, हा आत्मा कामक्रोधादिकांस वश होऊं नये, सर्व आचरण विवेकास अनुसरून, सत्यास अनुसरून, मजकडून व्हावें, क्षुद्रता अंतःकरणांत शिरूं नये, वृत्ति सदासर्वकाळ उदार असावी, असा मनोरथ अंतःकरणामध्यें उत्पन्न होतो, आणि त्याविषयीं अंतःकरण इतकें उत्कंठीत होतें कीं ह्या प्रकारची स्थिति झाली नाहीं तर माझें जीवित व्यर्थ असें वाटतें. परंतु हा मनोरथ केवळ मनोरथच होऊन रहातो, वास्तविक अंतःकरणाची तशी स्थिति होत नाहीं. हा मनोरथ सिद्धीस नेण्याविषयीं होईल तितका यत्न करावा, असा मी निश्चय करितों; परंतु आचरणसमयीं तो निश्चय व्यर्थ जातो. त्या वेळेस आपल्या ज्या दुष्ट मनोवृत्ति आहेत, त्यांच्या आधीन होऊन मी दुष्ट आचरण करितों; तो मनोरथ एकीकडे रहातो, तो निश्चय एकीकडे रहातो, आणि पुनः विचार क-

रावयास लागलों ह्मणजे आपल्या पूर्वीच्या मनोरथाचें स्मरण होऊन, आपल्या ह्या दुर्वृत्ताच्या योगें अत्यंत शोक होतो. कोठें तो मनोरथ? कोठें तो निश्चय? आणि कोठें माझें हें आचरण? असा उद्गार निघतो. तर मंगलमय जगदात्मन्, याच प्रकारची सतत माझी स्थिति राहिली तर सत्यासत्य विवेचन करण्याचें सामर्थ्य जें तूं दिलेंस, सत्याविषयीं, शुभाविषयीं, साहजिक जी पूज्यवृत्ति तूं अंत:करणांत रोंविलीस, तिचें फळ काय? आणि माझ्या जीविताचें तरी फळ काय? जर उत्तरोत्तर अंत:करणांतील दोष नष्ट होऊन दया, क्षमा, शांति, यांसारख्या वृत्ति उद्भूत होण्याची योग्यता असून, उद्भूत झाल्या नाहींत, जर माझें अंत:करण शक्यता असून, उदार व उन्नत झालें नाहीं, तर मग माझ्या जीविताचें फळ काय? पशु, ज्याला सत्यासत्य ज्ञान नाहीं, त्याजमध्यें आणि मजमध्यें भेद काय? तस्मात् जगदात्मन्, निःसंशय, हा आत्मा उत्तरोत्तर उन्नतदशेप्रत जावा, पवित्र, शुद्ध व्हावा, हा तुझा उद्देश आहे. पण माझी तर स्थिति अशी; ह्मणून ह्या दीनाची करुणा तुजला येऊं दे. कृपानिधे, माझें जीवित निष्फल जाऊं नये, तूं दिलेलें सत्यासत्याविषयीं साहजिक ज्ञान व्यर्थ जाऊं नये, अशी योजना कर. माझा निश्चय अंत:करणामध्यें दृढ राहील असें कर.

कामक्रोधादिकांचें प्राबल्य मोडून टाक, आणि उत्तरोत्तर जिजविषयीं अंतःकरणांत मनोरथ उत्पन्न होतो अशी जी मंगलमय उन्नत स्थिति, ती प्राप्त होण्याच्या मार्गास मला लाव, आणि सुरळीतपणें त्याच मार्गानें चालेन असें कर. पुनः पुनः त्या मार्गापासून मी च्युत झालों तर आपल्या अगाध योजनेच्या द्वारें मजला त्या मार्गावर आणून ठेव. आणि याप्रकारेंकरून शाश्वत सुखधामामध्यें प्रवेश करण्यास मी यत्किंचित् तरी योग्य होईन असें कर.

---

## प्रार्थना १०.

दयामय, इकडे ताप, तिकडे पाप; इकडे भीति आणि दुःख, तिकडे अधमपणा, दुष्टपणा, अशुचिता, यांच्या योगेंकरून पूर्णपणें हें अंतःकरण गांजलें. व्यर्थ सर्व कांहीं; व्यर्थ हा जन्म; व्यर्थ ही मानवबुद्धि; व्यर्थ हे तुजविषयीं बोल. ब्रम्हांडनायक तूं, दयामय, वत्सल, माझा मायबाप असून अशी माझी स्थिति असावी काय? कृपाकटाक्षेंकरून मजकडे कां अजून अवलोकन करीत नाहींस? विवेक माझ्या अंतःकरणांत कां ठरत नाहीं? अंतःकरणांत धैर्य कां वास करीत नाहीं? शांति, शुद्धि, मंगलभाव अजून कां प्रविष्ट होत नाहींत? तर

मग माझा सर्व जन्म व्यर्थ जावा, आणि मी अनिवार दुःखां-मध्यें पडावें हाच तुझा उद्देश काय? विश्वाकडे पाहिलें, सर्व कांहीं तुझें जें चरित आहे त्याचें अवलोकन केलें, म्हणजे अंतःकरण सांगतें कीं, नाहीं; तसा तुझा उद्देश नाहीं. तर मग अजून मी असा कां? तुझ्या दयेविना मी ह्या स्थितींतून पार पडणार नाहीं; मजमध्यें सामर्थ्य नाहीं, सर्वथा मी दुर्बळ. तूं परम समर्थ, ह्या ब्रह्मांडामध्यें तुझ्या ज्या योजना चालू आहेत, त्या परम गुह्य आहेत. त्यांच्या योगें सर्व कांहीं सिद्धीस न्याव-यास तूं समर्थ आहेस. तर त्या प्रकारची एक गुह्य योजना कर, आणि ह्या त्रासांतून मजला सोडीव. अंतःकरणास आश्वा-सन दे. आपणाविषयीं भक्ति आणि भाव प्रदीप्त करून आणि आपलें स्वरूप अंतःकरणापुढें जागत राहील असें करून शांति, धैर्य आणि कामक्रोधादिकांचें आकलन करण्याविषयींचें सा-मर्थ्य हीं मजला दे. याप्रमाणें भक्ति आणि भाव अंतःकर-णामध्यें सतत वृद्धिंगत झालीं म्हणजे, हीं दुःसाध्य नाहींत. तर भक्ति आणि भाव, श्रद्धा आणि भरंवसा हीं दृढ होतील असें कर.

## प्रार्थना ११.

हे परमपवित्र जगदीश्वर, तूं हा भूगोल तसेच दुसरे असंख्य गोल निर्माण केले आहेस. ह्या पृथ्वीवर अनंत प्राणी निर्माण करून, त्यांत आह्मां मनुष्यांस उत्तम ज्ञानशक्ति दिली आहेस. तिच्या योगानें सर्व प्राणिमात्रांपेक्षां आह्मांस श्रेठत्व दिलें आहेस. ह्या विश्वाची रचना, हे आकाशांतील चंद्र, सूर्य व दुसरे कित्येक ग्रह व असंख्य तारे ह्यांची सुंदर शोभा व त्यांस लावून दिलेले अढळ नियम पाहून, आमचें मन आनंदानें आणि विस्मयानें भरून जातें. तुझी शक्ति अगाध! तुझी करुणा अपार! तुझा महिमा अगम्य आहे. ही पृथ्वी धनधान्य, फलपुष्पादिकांनीं तशीच दुसऱ्या नानाविध पदार्थांनीं तूं भरपूर करून ठेविली आहेस, ही तुझी आमच्यावर केवढी दया आहे! ह्या दयेचें ह्या अज्ञान पामर बालकांनीं काय वर्णन करावें?

तूं महा समर्थ आहेस. तुझी उपमा कोणासही देतां येत नाहीं. ह्या चर्मचक्षूंनीं जिचें आकलन करितां येईल अशी तुझी मूर्ति नाहीं. तुला आकार नाहीं. तूं चैतन्यरूप असून सर्वत्र व्यापून आहेस. सर्व काळीं तूं आमच्या जवळ आहेस. तूं आह्मांस दिसत नाहींस पण तूं आह्मांस सर्वकाल

पहात आहेस. तुला हस्तपादादि अवयव नाहींत, तरी तूं सर्व व्यापार करीत आहेस. तूं तुझ्या सर्व भक्तांचे योग्य मनोरथ पूर्ण करतोस. तुझी आह्मीं अंतःकरणपूर्वक मानसिक पूजा अर्चा करावी आणि तूं लाऊन दिलेल्या नीतीच्या मार्गानें चालावें, हीच तुझी खरी आराधना व आमचा धर्म आहे. याजकरितां भगवन्! तुला आह्मीं शरण येऊन तुझ्या चरणीं साष्टांग प्रणिपात करितों.

अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।
तस्मात् कारुण्यभावेन रक्ष रक्ष परेश्वर ॥१॥
ॐ शांतिः शांतिः शांतिः

---

## प्रार्थना १२.

हे सर्व जगाच्या उत्पादका आणि नियामका परमेश्वरा, आकाशांत त्वां उत्पन्न केलेले गोल, व त्यांतील ही पृथ्वी, तिजवरील वातावरण, उदक, अग्नि, पर्वत, धातु, वृक्ष आणि प्राणी, हीं सर्व आह्मीं प्रत्यक्ष पहातों, आमच्या मनोभावना व आत्मिक भाव यांची आह्मांस निःसंशय प्रतीति आहे. हे जगत्कारणा, हीं सर्व तुझीं कृत्यें निर्नायक नगरासारिखीं श्रीहीन किंवा उद्ध्वस्त होऊन पडलेलीं अशीं दिसत नाहींत; प-

रंतु तुझ्या सृष्टीचे व्यवहार नांदत्या राज्यासारखे ऐश्वर्यसंपन्न व अचुक व्यवस्थेनें सुयंत्र चाललेले आहेत असें आह्मीं सर्वत्र पाहतों. यांचा सर्वसमर्थ नियंता तूं आहेस, तो मात्र दिसत नाहींस. हा आमच्या दुर्बळ हृदयाचा भ्रम, हे ज्ञानदात्या प्रभो, तूं कृपा करून दूर घालीव. तुझी या विश्वांतील व्यापक सत्ता, शक्ति, चिन्मयता, प्रीति आणि आनंद यांचा आह्मांस पूर्ण बोध होऊंदे. तुझ्या सत्तेचा आमच्या हृदयांत निभ्रांत विश्वास बाणूंदे. बाह्य विषयांच्या मोहानें आमचीं मनें बावरीं होऊं देऊं नको. आमच्या मनाच्या अनिवार वृत्तींचें आवरण करण्याची शक्ति देऊन, आमचे सर्व अध्यात्मिक भाव तुझ्याठायीं सलग्न होतील असें कर, ही आमची तुजपाशीं प्रार्थना आहे.

---

## प्रार्थना १३.

जयसच्चिदानंद सर्वसमर्थ परमेश्वरा ! तूं या स्थिरचर संपूर्ण विश्वाचा जनक आहेस. सर्वांची उत्पत्ति, पालन आणि लय करणारा तूंच एक आहेस. आह्मांस तूं ज्या स्थितींत निर्माण केलेंस, त्या स्थितीप्रमाणें आह्मी तुझी मर्त्य, अल्पज्ञ, सुखदुःख भोगणारी व पराधीन प्रजा आहों. आह्मीं काय

करावें, आणि कसें असावें, याचा सर्व आधार, तुझी इच्छा हीं-च आहे. हें आह्मांस समजण्यास तुझ्या भक्तीवांचून आह्मी कधींही शक्तिमान् होणार नाहीं. यास्तव तुझ्या ठायीं आमच्या अंतःकरणाचा शुद्ध आणि प्रेमळ भक्तिभाव आकर्षून घे. आमच्या हृदयाची दुर्बलता, भ्रांति, मोह, आणि अज्ञान, हें सर्व दूर कर; दुष्ट वासना व दुर्विकार यांचें दमन कर; आणि तूं लावून दिलेल्या मार्गानें आह्मांस चालायास तूं धैर्य दे. आमचे स्वभाव निर्मळ व सात्विक कर. आह्मीं तुझीं लेंकरें ह्मणायास योग्य होऊं, असें आचरण आह्मांस करितां येऊंदे. तुझ्या प्रीतींत सर्व बंधूंची प्रीति साधितां येईल अशी आह्मांस शक्ति दे. आणि हे दयानिधे, आमचा सर्व विश्वास, प्रीति आणि आशा हीं तुझ्या सुरम्य पदीं संयुक्त कर. हीच तुजपाशीं आमची प्रार्थना आहे.

---

## प्रार्थना १४.

हे जगत्कारण, जगज्जीवन, जगदीश, या विश्वाच्या नियमनार्थ तुझ्या अगम्य योजनेनें भयंकर रोगांच्या सांथी, झंझावाताचीं वादळें, उदकाच्या अतिवृष्टीनें नद्यांस अमर्याद पूर, अग्नीची धाड, अनावृष्टीनें दुष्काळ, भूमिकंपादि उत्पात,

परचक्राचे उपद्रव, युद्धजनित नाश, अकालीं मृत्यु, आणि आकस्मिक अनर्थ इत्यादि महा अरिष्टें उपस्थित होतात. हीं टाळण्यास तुजशिवाय दुसरा कोणी समर्थ नाहीं. तुझे इच्छेस आड येईल असा कोणी नाहीं. हे जगन्नियंत्या देवा, आमचा तूं परम दयाळू व प्रेममय पिता असतां तीव्र शस्त्रधारी असा महाभयंकर दिसतोस. आह्मी तुला विसरतों, तुझ्या आज्ञारूप सन्मार्गापासून भ्रष्ट होतों, त्या आह्मां लेंकरांस मार्गावर आणण्याचें कार्य, या तुझ्या योजनेंत साधावें, ह्मणून हे उपाय योग्य आहेत. यांत जरी तुझे उत्तम संकल्प, आणि मंगल हेतु आहेत, तरी ह्या तुझ्या घटना, आह्मा दीन, अशक्त, व अज्ञान लेंकरांस परम उग्र भासून दुःसह असें भय उत्पन्न करितात. येणेंकरून आह्मी अत्यंत भयभीत, व्यथित, व बावरे होतों. अशा प्रसंगीं हे पतितपावन! हे देवाधिदेव! हे करुणानिधे! परमेश्वर! तूं दया करून आमच्या सर्व अपराधांची क्षमा कर. आह्मी तुला शरण आलों आहों, आह्मी तुझे आज्ञानुवर्ती दास होण्यास, व तुझें परम सुख अनुभविण्यास निभावले जाऊं, अशा प्रकारें सर्व अरिष्टांत आमच्या चित्तांचा व जीवांचा बळकट धीर, व भरंवसा तूं हो. आमच्या सर्व मनोवृत्ति अनन्यभावानें तुझ्या भक्तींत रंगवून, त्यांस कोण-

त्याही आपदेपासून भय आणि व्यथा बाधेनाशी कर. आ-ह्मांस तुझ्या कृपेच्या पंखाखालीं घेऊन तूं आमचें संरक्षण कर. सर्व संकटांचा परिहारक तूं हो. तूं आमचे दुर्ग, परम आश्रय, आणि परम गति हो. हे दीनदयाळा प्रभो ! तूं आह्मांवर शांत व प्रसन्न हो, आणि व्याकुलता, व व्यग्रता यांतून आमच्या चित्तांस सोडवून, आमचीं मनें कृतज्ञतेनें तुझी स्तुति व भक्ति करण्यास तत्पर, आणि स्वस्थ होतील असें तूं दयाभावानें कर, हीच तुझ्या चरणापाशीं आमची प्रार्थना आहे,

---

## प्रार्थना १५.

हे सर्वसमर्थ परमेश्वरा! त्वां जीं उत्पन्न केलेलीं तुझीं इतर कृत्यें, तीं, तुझी अगम्य लीला, अतुल पराक्रम, अगाध ज्ञान, अद्भुत शक्ति, अपार प्रीति, अपरंपार दया, अनुपम औदार्य आणि सनातन ऐश्वर्य, हीं प्रदर्शित करितात. परंतु आह्मीं तुजपासून उत्तम मनोभाव पावलेले असून, व तूं आह्मांवर असंख्य उपकार केलेले असून, आह्मीं काय करतों आहों? आमचा उपयोग काय? अनन्यभावानें आह्मीं तुजवर दृढतर विश्वास ठेवून, आपल्या स्थितीची सर्व चिंता, व भार तुजवर टाकून द्यावा; आणि स्वस्थचित्तानें तुजवर प्रीति ठेवावी,

तुझ्या पवित्र व हितकर आज्ञा, उत्साहानें जपून पाळाव्या; हेंच आह्मांस योग्य आहे. दुसऱ्यानें तुला अन्य वस्तूनें संतुष्ट करावें, अशी तुजमध्यें कांहीं आनंदाची न्यूनता नाहीं. तूं स्वयें सदा आनंदरूप प्रभु आहेस; तुजपासून उलटा दुसऱ्यास आनंद होतो. जरीं आह्मीं तुझा सन्मान केला नाहीं, किंवा तुझें यश वर्णिलें नाहीं, तरी तुझें महत्व, व तुझी कीर्ति, हीं प्रकट झाल्याशिवाय राहणार नाहींत, किंवा तीं उणींही व्हावयाचीं नाहींत. तूं परिपूर्ण, सर्व सद्गुणांचा कंद आहेस, तुला कशाचीही गरज नाहीं; परंतु आह्मां दुर्बळांस बहुत गोष्टींची गरज आहे. तूं कृपाळू होऊन उदारपणें जगास आवश्यक अर्थ पुरवितोस; यास्तव आह्मीं कृतज्ञ होऊन तुझे उपकार मानावे, तुझी स्तुति व भक्ति करावी, जेणेंकरून तुझा सन्मान होईल, व तूं संतोष मानून घेशील, अशी वर्तणूक आह्मीं ठेवावी, आह्मीं तुझें यथार्थ महत्व वर्णावें, तुझीच शुद्ध कीर्ति वाखाणावी, हें आमचें उचित कर्तव्य व हा आमचा वास्तविक धर्म असतां, हे दयानिधे देवा! आह्मीं तुला विसरतों, आह्मीं मोह, मद, गर्व, कपट व द्वेष इत्यादि दुर्विकारांस वश होऊन, नाशिवंत स्वार्थ व मान मात्र शोधितों; यांत वास्तविक पहातां आपला नाश संपादितों. बाह्यात्कारें तोंडानें मात्र तुला भ-

जतोंसें दाखवून, मनापासून तुजवर विश्वास व प्रीति ठेवीत नाहीं; अंतर्यामीं तुझी भीति धरून तुझ्या आज्ञेप्रमाणें चालायास प्रयत्न करीत नाहीं; बंधुजनांशीं असत्यानें, द्वेषानें, गर्वानें व अन्यायानें वागतों; तुझ्या भक्तींत खचित आमचें हित व मान आहे असें न समजून, तुझ्या आज्ञेबाहेर पाऊल टाकून भ्रष्टलों, आणि दुःखास पात्र झालों, ही आह्मीं फारच अश्लाघ्य, व दूषणार्ह गोष्ट केली. आमच्यामध्यें कांहीं योग्यता राहिली नाहीं. तर आतां हे करुणानिधे बापा! तूं आमचा मोह दूर करून, दयेनें आमच्या अपराधांची क्षमा कर; आणि आह्मांस तुझा पवित्र मार्ग दिसून, त्यांत चालायाची शक्ति येऊं दे. हे जगदुद्धारका! आमच्या जन्माचें सार्थक होईल असें कर, हीच तुजपाशीं आमची प्रार्थना आहे.

---

## प्रार्थना १६.

हे प्रेममय कुटुंबाच्या दैवता! आह्मी सहकुटुंब मिळून नम्रतेनें तुला हाक मारितों; तूं आह्मांला एक वेळ दर्शन दे. तुझी पूजा करून आह्मी जीवन पवित्र करितों. आह्मी तुझेच पुत्र व कन्या, तुझेच दास व दासी आहों. आह्मांला तुझ्या चरणांचा आश्रय देऊन, या संसारास धर्माचा संसार कर;

असें कीं, जेणेंकरून आह्मी तुला बाप समजून तुझी भक्ति करूं, आणि सद्भावानें एकमेकांच्या उपयोगीं पडूं. हे पित्या! तूं आह्मांस राग, हिंसा, लोभ, व विषयासक्ति यांपासून मुक्त कर, व आमचें सगळें जीवन पुण्यमार्गी लाव, जेणेंकरून आह्मी तुझीं योग्य लेंकरें होऊन या कुटुंबांत सर्व काळ पवित्र शांतिसुखाचा उपभोग घेऊं.

---

## प्रार्थना १७.

आह्मी सतरा प्रभूंचे दास होऊन मारले जात आहों. कधीं धन, कधीं मान, कधीं आईबाप, कधीं भार्या, कधीं पुत्रकन्या, आणि कधीं स्वदेशाची सेवा करूं लागतों. मन नेहमीं विक्षिप्त असतें, व हृदयाचा अनुराग अनेक विषयांच्या ठायीं लागतो. यांतून कोणताही प्रभु आह्मांस प्रसन्न झाला नाहीं, आणि आह्मीही कोणाच्या सेवेंत सुखी झालों नाहीं. आह्मांस आतां असें समजलें आहे कीं, एकाग्रचित्तानें तुझ्याच चरणांची सेवा केली असतां शांति पावूं. हे प्रभो! तूं आह्मांस आपलेंसें कर.

## प्रार्थना १८.

हे बापा ! आमचें मन फार अधीर. हा दोष सामान्य असा समजून याची आह्मीं किती उपेक्षा केली आहे ? परंतु जेव्हां आह्मी विचार करून पाहतों तेव्हां येणेंकरून आमचें फार अनहित झालें आहे असें दिसून येतें. आह्मी एकाद्या विपत्तींत पडलों असतां घाबरून निराश होतों आणि धर्माचीं सर्व कामें सोडून देतों. कितीक वेळां आमचा विश्वास देखील डळमळीत होत असतो. तर तूंच असल्या भितऱ्या मनास कृपा करून अधैर्यापासून वांचीव.

---

## प्रार्थना १९.

हे दयाळा ! आह्मी तुझ्या प्रेमाचा अविश्वास धरूं नये. दुःख आणि विपत्ति यांत तुझा मंगल हस्त आह्मांवर सदोदित असावा. तूं सुखसंपदा देऊन लेंकरांस जशी कृतज्ञता शिकवितोस तशीं विघ्नें व कष्ट यांत आह्मांला धैर्य, सहनता, विनय व वैराग्य हीं शिकीव. मग आह्मी संकटांत पडलों असतां तुझ्या दयेचा संशय कां धरूं ? हे पित्या ! आह्मी सुखदुःखादि सर्व अवस्थेंत तुलाच अनुसरून वागावें असें कर.

---

## प्रार्थना २०.

हे जगज्जननी, या संसारवनामध्यें आह्मांला तुझा पदर धरूंदे; आह्मांला फार भय वाटतें. किती शत्रु चोहोंकडे आमचा वध करायास नेहमीं टपले आहेत ! ! आह्मी अति दुर्बल, त्यांच्या हल्ल्यांतून निभावण्याची आह्मांस शक्ति नाहीं. निराश्रित व असाह्य लेंकराप्रमाणें आह्मी तुला हांका मारितों. दया करून तूं आमचें रक्षण कर.

---

## प्रार्थना २१.

हे पतितपावन ! आह्मी कोणत्या पापापासून तरावें ह्मणून तुजपाशीं प्रार्थना करावी ? पातकापासून आमचा उद्धार कर असें जेव्हां ह्मणतों, तेव्हां एक नाहीं; पण असंख्य आणि नानाप्रकारच्या पातकांचें स्मरण होतें. तूं साक्षी होऊन पाहात आहेस कीं, आमचें मन प्रायः सर्व प्रकारच्या पापांनीं दूषित झालें आहे. अहंकार, स्वार्थपरता, हिंसा, काम, क्रोध, कपट, अविश्वास व संसाराची आसक्ति अशीं आमच्या मनांत सर्व पापें गुप्तपणें राहिलीं आहेत. हीं वेळोवेळ पेट घेतात. हे तारणाऱ्या, या महापाप्यास सर्व दोषांपासून तुझ्या कृपेच्या

योगानें मुक्त कर. आतां ह्यांच्या ज्वाला मला सहन होत नाहींत; देवा धांव, देवा धांव.

---

## भोजनकालीन प्रार्थना.

### प्रार्थना १.

हे सर्व दात्या परमेश्वरा, तूं कृपाळू होऊन दिलेलें हें अन्नोदक पवित्र कर, आणि ह्याचें भक्षण करून उन्मत्त न होतां तुझ्या सेवेंत तत्पर राहूं व गरिबांस यथाशक्ति साह्य करण्यास उत्सुक होऊं असें कर, हीच आह्मां दीनांची तुजजवळ विनवणी आहे.

---

### प्रार्थना २.

हे दयाळु पित्या! आमच्या शरीरपोषणार्थ ही जी खाण्याची सामग्री तूं आह्मांस स्नेहानें दिली आहेस इजकरितां कृतज्ञमनानें तुझ्या चरणीं आह्मी प्रणाम करितों.

---

## शयनकालीन प्रार्थना.

हे संरक्षक प्रभो, नाटकगृहांत एकदां पडदा पडला ह्मणजे नाटकपात्रें प्रेक्षकांच्या दृष्टिआड होतात, तद्वतच हा

संसार तुझ्या सान्निध्यापासून मला दूर करितो. त्यामुळें माझ्या हातून होऊं नयेत अशीं कृत्यें होतात, आणि जीं उचित कर्मे तीं होत नाहींत. आजच्या दिवशीं प्रभो, मजकडून पुष्कळ अन्यथा गोष्टी घडून आल्या. त्या सर्वांची क्षमा करून पुनरपि माझ्या हातून अशीं कृत्यें न होतील असें कर. आजची निद्रा हीच माझी शेवटली निद्रा व्हावी अशी जर तुझी इच्छा असली तर तसें होऊंदे; आणि इहलोकीं ज्याप्रमाणें निद्रेंतून जागृत झाल्यावर, तुझ्या कृपेनें मला हुरूप व आनंद प्राप्त होतो, तद्वतच, हे मायबाप, परलोकीं मला होवो. माझ्या गणगोतांस सुखी ठेव, आणि आज रात्रीं येणाऱ्या सर्व संकटांपासून मला दूर राख. तूं दयाशील प्रभु आहेस ह्मणूनच मी अशी तुझी प्रार्थना करितों. शेवटीं हा स्वप्राण तुझ्या चरणीं अर्पण करून तुझा निरोप घेतों.

---

## स्त्रियांच्या प्रार्थना.

### प्रार्थना १.

हे दीनदयाळा, सद्बुद्धिदात्या, परमेश्वरा, तूं या संसारांत आह्मांस ज्या स्थितीमध्यें ठेविलें आहेस, त्या स्थितीस योग्य असे गुण आमच्या ठिकाणीं येवोत, आणि त्या स्थितीस उ-

च्चित अशाप्रकारचें आमचें आचरण सदा असो. आह्मीं पुरुषांचें साह्य करून त्यांच्या सांसारिक व पारमार्थिक स्थितीसंबंधीं सुखदुःखाच्या विभागी व्हावें अशी तूं आह्मांस प्रेरणा कर. आह्मीं उभयतांनीं परस्परांच्या आत्मोन्नतीस साधनभूत होऊन, आमचीं कुटुंबें स्वर्गीय कुटुंबें होवोत. आह्मीं आपल्या प्रेममय सद्वर्तनानें कुटुंबांतील सर्व मनुष्यांस शांति आणि सुख यांचा लाभ करून द्यावा एतद्विषयीं आमचीं अंतःकरणें नेहमीं सादर असोत कुटुंबांतील अल्पवयी बालकांचें सांगोपन करून सुमार्गास लावणें आणि त्यांच्या बुद्धींत धार्मिकपणाचें बीजारोपण करणें याचें जोखीम विशेषेंकरून आह्मां स्त्रीजनांवर आहे, यास्तव आह्मांकडून तें कर्तव्य यथास्थित सिद्धीस जाण्यास तूंच साह्यकारी हो, आणि जशी त्यांच्या शरीररक्षणाविषयीं आह्मांस साहजिक कळकळ आहे, तशीच त्यांच्या आत्मरक्षणाविषयीं आमच्याठायीं कळकळ सतत जागृत राहो. बाह्य भूषणें आह्मांस मिळोत किंवा न मिळोत, त्यांच्या योगें शरीर शोभविण्याकडे आमचें लक्ष्य न जात. शांति, क्षमा, दया, मर्यादा, सौम्यता, सुमति, श्रद्धा आणि भक्ति या आत्मिक भूषणांनीं आपणास भूषित करण्याविषयीं आमची सतत प्रवृत्ति असो.

## प्रार्थना २.

हे जगदीश्वरा, मायबापा, आह्मां स्त्रियांची सांप्रतची स्थिति निकृष्ट झाली आहे. तींतून आह्मांस काढणारा तुज-वांचून कोण आहे? ज्या कोणी आमच्या भगिनी किंवा आमचे बांधव स्वतः कृतार्थ होऊन प्रेमपुरःसर आमच्या उन्नतीसाठीं झटत आहेत, त्यांसही तूंच साह्यकारी हो. त्यांच्या उद्योगास जीं विघ्नें येतील त्या सर्वांतून पार पाडून आपला हेतु सिद्धीस नेण्याविषयीं त्यांचा दृढनिश्चय, उत्साह व धैर्य यांचें तूंच सतत रक्षण कर. आमचें व्यावहारिक जीवन तसेंच पारमार्थिक जीवन सफल करण्याचें आमच्या अंगीं ज्ञान किंवा सामर्थ्य यांतून एकही नाहीं. यास्तव हे देवा, उभय जीवनांमध्यें आमचा उचित मार्ग तूंच कृपाळू होऊन आह्मांस दाखीव, आणि त्यामध्यें सतत आह्मीं रहावें अशी बुद्धि आह्मांस दे. व्यावहारिक ज्ञानानें आमचें मन प्रकाशित होवो, सद्भावानें आमचें अंतःकरण निर्मळ होवो, आणि तुजविषयीं पूर्ण प्रेमानें आमचा आत्मा शुद्ध आनंदामध्यें निमग्न होवो, हीच आह्मा दीन अनाथ स्त्रीजातीची तुजपाशीं प्रार्थना आहे.

## प्रार्थना ३.

हे सर्व कुटुंबांच्या रक्षका देवा, तुझ्या कृपेनें ज्या पतीशीं माझा विवाह झाला आहे, त्याचें प्रीय करण्याविषयीं मला सतत बुद्धि दे. त्यास प्रपंचांत आणि पारमार्थिक उद्योगांत साह्य करण्याविषयीं मला सामर्थ्य दे. त्याचें जसें मजवर अकृत्रिम प्रेम आहे, तसेंच माझेंही त्याजविषयीं सतत असो. प्रापंचिक व पारमार्थिक व्यवहारामध्यें अनेक प्रकारच्या अडचणींनीं किंवा अपायांनीं किंवा विफल होणाऱ्या उद्योगांनीं जेव्हां जेव्हां त्याचें अंतःकरण उद्विग्न किंवा चिंताग्रस्त किंवा निराश होईल, तेव्हां तेव्हां त्यास धीर देऊन आपल्या मधुर वाणीनें, सौम्य वृत्तीनें, आणि सप्रेम अंतःकरणानें त्याचें समाधान करून त्याच्या अंतःकरणांत पुनः उत्साह उत्पन्न करण्याविषयीं आह्मांस तूं तत्पर कर. त्यास कशीही स्थिति प्राप्त झाली, तथापि तिजमध्यें संतोष मानून मी सदैव अनुकूल वृत्तीनें त्याशीं वर्तावें अशी पतिनिष्ठा मला प्राप्त होवो. त्याची आज्ञा पाळण्याविषयीं माझी सदैव तत्परता असो. कदाचित् त्याणें मला कधीं अनुचित आज्ञा केली तर शांतपणें, मंजूळ वाणीनें, त्यास तिजपासून निवृत्त करण्याचें बळ मला दे. आणि तो अशा आज्ञेपासून निवृत्त नच झाला,

आणि तुझी आज्ञा परिपालन करण्याकरितां व नीतीस अनुसरून वर्तण्याकरितां त्याच्या इच्छेप्रमाणें मला वर्ततां आलें नाहीं, तर त्यापासून माझा कांहीं छळ झाला तर तो शांतपणें सहन करून, त्याचें चित्त मार्गावर आणण्याच्या कामीं मजकडून आळस न होवो, आणि माझें त्याजवरील प्रेम उणें न होवो, ह्मणजे तूंच दयानिधि माझ्या सतत प्रेमापासून त्याचें अंतःकरण प्रेमार्द्र करिशील आणि तुझी आज्ञा परिपालन करण्याविषयीं आमच्या उभयतांच्याही चित्तांचें ऐक्य होईल. यास्तव हे देवा, तूं कृपाकरून अशाप्रकारें वर्तण्याची बुद्धि व सामर्थ्य मला दे.

---

## प्रार्थना ४.

हे प्रभो ! करुणानिधे ! तुझी मज अति पामर अबलेवर केवढी ही कृपा आहे ! तुझ्या निर्मल प्रेमानें परिपूर्ण अशा पृथ्वींत तूं समदर्शी असल्या कारणानें मजसारख्या अपराधिनीस सुद्धां किती प्रीतीनें वागवितोस ! अहाहा ! तुझ्या करुणेला तुझ्याच करुणेवांचून दुसरी उपमा देण्याजोगी या जगांत नाहीं. हे अनाथबंधो, तुझ्या न्यायी राज्यांत मीं फार फार अपराध करणारी एक अति नीच अबला आहें; हे

माझे प्रेमळे आई ! तुझ्यावांचून माझे अपराध पोटांत घालणारें आणि मला या पापभयांतून रक्षण करणारें दुसरें कोण आहे ? तूं माझे अपराध क्षमा कर असें ह्मणण्याचा सुद्धां मला अधिकार नाहीं; आणि तसें ह्मणण्यास मला धैर्यही होत नाहीं. कारण माझ्या हातून इतके अपराध झाले आणि होत आहेत कीं मीं, तुझ्या क्षमेस पात्र नाहीं असें मला खचित माहीत आहे. मी अपराधिनी आहें तेव्हां जर मी योग्य दंड घेण्यास मागें घेतलें तर आणखी जास्ती अपराध केल्यासारखा होईल. ह्मणून हे दयानिधे ! अपराध केल्याबद्दल अतिशय पश्चात्ताप पावून मोठ्या नम्रतेनें आणि दीनवाणीनें मी तुला प्रार्थितें कीं माझ्या पापांबद्दल तुला योग्य वाटेल तो दंड मला दे, आणि तो सहन करण्याची शक्तिही दे. तूं मला जो दंड देशील तो मला मोठा सुख देणारा होईल. तुझें शासन आईच्या लाडक्या प्रीतीसारखें गोड लागेल. तुझें तें प्रेमपूर्ण शासन मला सन्मार्गीं लावील, आणि मी पुढें तुझ्या करुणेस पात्र होईन, ही आशा माझ्या संतप्त हृदयाला अमृतवृष्टीप्रमाणें शीतल करीत आहे. आणि आनंदानें संजीवित करीत आहे. हे विश्वपालका, तूं माझें हित करणारा परमकृपाळू पिता आहेस. तूं मला पोसणारी स्नेहरूपिणी जन-

नी आहेस. तूं माझा सन्मार्गोपदेशक गुरु आहेस. तूं मला सर्व संकटांतून रक्षण करणारा समर्थ राजा आहेस. तुझ्या या अनंत जगतांत परमाणूप्रमाणें असणाऱ्या आणि चिर अपराधिनी अशा या अबलेचें रक्षण कर. हींच तुझ्या चरणापाशीं माझी प्रार्थना आहे.

---

## प्रभात प्रार्थना.

### प्रार्थना १.

हे विश्वप्रकाशक प्रभो! हें तुझ्या अपार करुणेचें शुभचिन्ह प्रभात मला सुप्रभात असो. तूं या तेजोमय सूर्याच्या द्वारें जसा जगांतील अंधकार नाहींसा करून सर्व प्राण्यांस सुखी करितोस त्याप्रमाणें तुझ्या ज्ञानानंदमय ज्योतीचें किरण माझ्या अज्ञानांधकारानें व्याप्त झालेल्या हृदयांत प्रवेश करून माझें अंतःकरण प्रकाशित करो. मी अतिपामर आहें तरी आनंददायिनी सूर्यप्रभा जशी सर्वत्र एकसारखी पसरते त्याप्रमाणें माझ्यावर तुझी अपार करुणा आहे. तूं मला न मागतां या जगांत सर्व सुखाचीं साधनें देत आहेस. हे दयानिधे विश्वंभरा, मज पामर अबलेवर तुझी ही अपार करुणा आहे याबद्दल मीं तुजपाशीं सर्वांतःकरणानें भक्ति आणि प्रेमपुरःसर कृतज्ञ आहें. देवा, माझें

मन सर्वदा तुझ्या ठिकाणीं भक्तियुक्त असो; माझ्या सर्व कृत्यांवर तुझी कृपादृष्टि असो. मला कांहींएक करण्याची शक्ति नाहीं; कर्ता करविता तूं आहेस. माझें अन्तःकरण कधींही धर्ममार्गाचें उल्लंघन न करो. हे विश्वकुटुंबिन्, हें जग तुझें घर आणि यांतील सर्व प्राणी तुझीं लेंकरें आहेत. तूं सर्वांवर सारखी प्रीति करितोस, ह्मणूनच माझ्यासारखा क्षुद्र प्राणीही तुझ्या कृपेस पात्र आहे. तुझी मजवर अपार करुणा आहे ह्मणून मी आज हें सुप्रभात पाहिलें. तुझ्या इच्छेप्रमाणें माझे इष्टमित्र, शत्रु आणि जगांतील सर्व प्राण्यांस हें प्रभात सुप्रभात असो. तूं सर्वांचें कल्याण कर. हे मंगलमया, तूं सर्वांच्या अमंगलबुद्धिरूपी अंधकाराचा नाश करून आपले आनंदमय ज्ञानप्रकाशानें सर्वांस आनंदित आणि पापमुक्त करून आपल्या कृपेस पात्र कर.

---

## प्रार्थना २.

हे दयाळू ईश्वरा! तुझ्या कृपेनें गेली रात्र निर्विघ्नपणें घालवून आज मी या नव्या दिवसांत प्रवेश केला आहे. आज कृपा करून तूं मला पापविचार, पापगोष्टी व पापकर्में यांपासून राख आणि असें बल दे, कीं जेणेंकरून मी तुझी

दासी होऊन तुझ्या कार्यांत सर्व दिवस कायावाचामनानें नियुक्त होईन.

---

## भोजनकालीन प्रार्थना.

हे विश्वंभर, हे विभो, तुझ्या अनुपमेय प्रीतीनें पुष्ट अशा मज अबलेला तुझ्या कृपेनें हें सुग्रास अन्न मिळालें आहे, याबद्दल मी तुजपाशीं चिरकृतज्ञ आहें. माझ्या या क्षुद्र जीवनापासून तुझ्या इच्छेप्रमाणें कोणतेंच काम होत नाहीं आणि मी सर्वस्वीं अपराधिनी असतां दयासागरा, तूं मला हें अन्न दिलेंस, तेव्हां तुझ्या करुणेला काय उपमा आहे! मी सर्वदा अपराध करीत असतांही, माझ्या त्या अपराधांकडे लक्ष न देतां स्नेहस्वरूपिणी जननीप्रमाणें तूं मला पोसतोस, आणि माझें कल्याण करितोस. हे विश्वपालका, या तुझ्या दयेनें पवित्र झालेल्या अन्नापासून माझ्या शरीरांत आणि मनांत पवित्र धर्ममार्गीं रहाण्याची शक्ति येवो आणि तुझ्या इच्छेविरुद्ध कोणतेंही काम न करण्याचें धैर्य येवो. माझ्या शारीरिक आणि मानसिक बलाची व आयुष्याची वृद्धि होवो. मी जितका काळ जीवंत असेन तोंपर्यंत कधींही मजकडून अधर्म न व्हावा, असा तूं मला आशीर्वाद दे.

---

## शयनकालीन प्रार्थना.

### प्रार्थना १.

हे विश्वसुखदायक प्रभो, तुझ्या पवित्र आणि मंगल इच्छेस अनुसरून तूं दिलेल्या शक्तीप्रमाणें मी आज झोंपेंतून जागी झाल्यापासून आतांपावेतों जितकीं कांहीं बरींवाईट कृत्यें केलीं तीं सर्व तूं पहात आहेस. तूं न्यायमूर्ति आहेस तेव्हां माझ्या कृत्यांचा निवाडा करून योग्य बक्षीस अथवा दंड देणारा तूं समर्थ आहेस. या जगांत माझ्यासारखी पामर अबला दुसरी नाहीं तरी मीं तुझ्या कृपेस पात्र आहें. तूं माझ्या अंतःकरणाला सन्मार्गीं लावून योग्य वाटेल तर माझ्या अपराधांची क्षमा कर. मला या दिवसांत जसें मोठ्या ममतेनें अन्नोदकादि देऊन आनंदांत ठेविलेंस आणि सर्वत्र भयांपासून माझें रक्षण केलेंस, तसेंच या रात्रीं माझें सर्वप्रकारें रक्षण कर. तुझ्या विशाळ आणि पवित्र अंकावर माझ्या आत्म्याला मी ठेविलें याचें तारण आणि रक्षण करणारा तूं समर्थ आहेस.

---

### प्रार्थना २.

हे दयाळु ईश्वरा! आज तूं मला नानाप्रकारचे रोग, विपत्ति, व पापें यांपासून रक्षिलेंस, आणि अन्नवस्त्र व ज्ञान हीं

दिली आहेस, यास्तव मी तुझी अतिशय आभारी आहें. मी आज जीं कांहीं पापें केलीं आहेत त्यांपासून माझा उद्धार कर आणि दिवसानुदिवस मला पुण्यमार्गांत अग्रेसर कर. ही ह्या बालिकेची तुजपाशीं प्रार्थना आहे.

---

## मुलांच्या प्रार्थना.

### प्रार्थना १.

हे दयाळू परमेश्वर, तूं आह्मां बालकांस, अन्नवस्त्र देऊन आमचें संरक्षण करितोस; आह्मांस ह्या जगताचें कांहीं एक ज्ञान नाहीं तें उत्तरोत्तर आह्मांस प्राप्त करून देत आहेस; आमच्यावर जीं अनेक संकटें व दुःखें येतात त्यांतून आमचा बचाव करितोस; आह्मांस आनंद व सुख प्राप्त व्हावें ह्मणून नानाविध पदार्थ ह्या जगतामध्यें तूं निर्माण केले आहेस; त्या तुला हे दीन बालक साष्टांग नमस्कार करून हेंच मागणें मागतात कीं, आह्मांस वाईट मार्गाकडे जाण्याची बुद्धि न व्हावी, दुःसंगतीपासून आमची सुटका व्हावी, आणि तुला जें काय प्रीय असेल तेंच आमच्या हातून व्हावें. परम कृपाळू देवा, आमची ही प्रार्थना तूं मान्य कर.

---

## प्रार्थना २.

हे सर्वसमर्थ प्रभु, आह्मीं जन्मास आल्यापासून आमचे आईबाप आह्मांस फार ममतेनें वागवीत आहेत, आमचें पालन पोषण करीत आहेत, आह्मांस कांहीं दुखणें बहाणें येतें तेव्हां फार काळजीनें नाना उपचार करून आह्मांस तीं बरें करण्याकरितां झटतात, परंतु, परमेश्वर, ही सर्व तुझींच योजना आहे. तूं सर्व प्राणिमात्रांचा पिता आहेस, तूं सर्वांची माता आहेस. तूं सर्वत्रांचें रक्षण करितोस. आह्मीं अगदीं अज्ञान आहों ह्मणून आमचे आईबाप आह्मांस वारंवार शिकवीत आहेत, पण भगवन्, तूं सर्वांचा ज्ञानदाता आहेस. सर्व मनुष्यांचें ज्ञान मर्यादित आहे, पण तुझें ज्ञान अपार आहे. हे सर्व जगताच्या मायबापा, आमच्यावर तूं जी इतकी ममता करितोस तिच्याबद्दल आह्मीं तुला काय द्यावें, तुझे हे उपकार आह्मीं कोणत्या रीतीनें फेडावे! हें होणें अगदीं अशक्य आहे. आह्मीं तुला जें देणार तें हेंच कीं तुझ्या चरणीं आह्मीं लोटांगण घालितों.

---

## प्रार्थना ३.

हे सर्वव्यापी भगवन्! ह्या सृष्टीमध्यें जे असंख्य पदार्थ आहेत त्यांकडे अवलोकन केलें असतां, त्यांचें सौंदर्य, त्यां-

ची रचना, हीं पाहून आह्मांस फारच चमत्कार वाटतो. तूं कोठें आहेस, तुझें रूप कसें आहे, हें जरी आह्मा अज्ञान्यांस समजत नाहीं, तरी ह्या तुझ्या कृतीवरून तूं सर्वत्र भरलेला आहेस अशी आमची खात्री होते. आणि सर्व जगतांत व्यापून रहाणारा जो तूं तो ह्या आमच्या चर्मचक्षूंस दिसणें अशक्य आहे असें सहजींच आमच्या लक्षांत येतें. तुझें अपार सामर्थ्य, तुझें अगाध चातुर्य, तुझी अत्यंत दया, ह्यांच्या साक्षी जिकडे पहावें तिकडे भरलेल्या आहेत. झाडें, त्यांचीं पानें, पुष्पें, फळें ह्यांकडे आह्मी निरखून पाहूं लागलों ह्मणजे आमचें मन फारच मोहित होऊन जातें. मनुष्यानें मोठ्या श्रमानें केलेले पदार्थ आह्मीं पहातों पण तुझ्या कृतीपुढें त्यांचें चातुर्य कांहींच नाहीं, असें तेव्हांच आह्मांस दिसतें. ही सर्वसौंदर्ययुक्त सृष्टि तूं परमेश्वर आमच्या सुखाकरितांच केली आहेस. तुझे आमच्यावर अगणित उपकार आहेत. आमच्या सुखाकरितां तूं जर इतकी योजना केली आहेस तर आह्मीं परस्परांस दुःख देणें, परस्परांचा नाश करणें हें अगदीं अयोग्य आहे. आह्मीं अशा गोष्टी केल्यास आह्मी तुझे फार अपराधी होऊं. तर भगवन्, अशी दुर्बुद्धि आमच्या मनांत कधींही तूं उत्पन्न होऊं देऊं नको. जेणेंकरून तुझ्या इच्छे-

प्रमाणें आमची वर्तणूक होईल अशी बुद्धि तूं आह्मांस दे. हीच तुजपाशीं आमची प्रार्थना आहे.

---

## प्रार्थना ४.

हे करुणासागर परमेश्वर, आमचे वडील तुझी आराधना करितांना, तुझें स्तवन करितांना, तुजपाशीं प्रार्थना करितांना आह्मी पहातों, तेव्हां आह्मांस त्यापासून मोठा आनंद होतो, व अशी इच्छा होते कीं, त्याप्रमाणें आह्मींही करावें, परंतु आमचें ज्ञान, आमची बुद्धि, अति अल्प. तुझ्या सामर्थ्याचें, तुझ्या गुणांचें मनन करूं लागलों ह्मणजे आमची मति कुंठित होते; आह्मीं वेडावून जातों. कोणत्या शब्दांनीं, कोणत्या रीतीनें तुझें स्तवन करावें हें आह्मांस कांहींच समजत नाहीं, आणि फार वाईट वाटतें. परंतु भगवन्, आमचा नाइलाज आहे. एवढी बुद्धि आह्मांस जेव्हां प्राप्त होईल तेव्हां होवो. सध्यां तर भगवन् तूं परम दयाळू आहेस व सर्वांवर तुझें सारखें प्रेम आहे असें तुझ्या भक्तांच्या तोंडून आह्मी ऐकतों, त्यावरून आह्मांस मोठा धीर येतो, कीं तूं आमच्या विद्येकडे, शब्दरचनेकडे, लक्ष्य देणार नाहींस. आमच्या मनांतील तुझ्या भक्तीविषयींची इच्छा ओळखून तूं आह्मांवर कृपा

करशील. तुझी स्तुति, प्रार्थना ह्या सर्वांबद्दल आह्मीं परमप्रेमानें व आनंदानें तुझ्या चरणीं मस्तक ठेवितों. ह्यांतच तूं सर्व मानून घे. आह्मांस ज्ञान, बुद्धि हीं जास्त देणारा तूंच आहेस. तीं तूं जसजशीं देत जाशील तसतसा त्यांचा उपयोग अन्य क्षुल्लक विषयांकडे न करितां, तुझ्याच सेवेकडे व्हावा अशी आमची इच्छा आहे, ती तूं पूर्ण कर.

---

# सामाजिक उपासना.

## उपासना १.

(उपासनेच्या आरंभीं चित्त एकाग्र होण्याकरितां भक्त मंडळींतून कित्येकांनीं किंवा सर्वांनीं एक किंवा अधिक पद्यें गावीं.)

### उद्बोधन.

हें विश्व ज्याणें निर्माण केलें, जो ह्याचें नियमन करितो, जो अमर्याद कारुण्यानें ह्यांतील असंख्य प्राण्यांचें रक्षण करितो आणि जोच एक पतितांचें पावन करितो तो एक, अद्वितीय, आणि अनाद्यनंत, असा परमेश्वर ह्या भजनगृहीं साक्षात् वास करितो. आपली वृत्ति विनम्र करून सर्व एकत्र

मिळून अंतःकरणपूर्वक त्याची आराधना आपण करूं या. तदर्थ आमचीं हृदयें विशुद्ध अशी पूज्यत्वबुद्धि व दृढानुराग इहींकरून तो परिपूर्ण करो आणि आमची प्रार्थना स्वीकारो.

( एथें ज्यांत परमेश्वर द्वितीय पुरुषीं असेल असें स्तवनपर एक पद्य गावें. )

स्तवनं.

**सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म ॥ आनन्दरूपममृतं यद्विभाति ॥ शान्तं शिवमद्वैतम् ॥ शुद्धमपापविद्धम् ॥**

तूं खरा साक्षात् परमेश्वर आहेस. तूं विश्वाचें जीवन आहेस. चेतनावंत प्राण्यांच्या चेतनेचा प्रभव तूं आहेस. त्वदभावीं एक क्षणभर सुद्धां आमची स्थिति होणार नाहीं. तूं अभ्यंतरीं, तूं बाह्यस्थळीं सन्निविष्ट आहेस. हे अनादि, सत्यस्वरूपा, आमच्या जीवांच्या जीवा, तुला आह्मी नमन करितों.

तूं अमूर्त आहेस. विश्व तुझें चातुर्य प्रकाशित करितें. तूं आह्मांपुढें उभा आहेस. तूं सर्वज्ञ आहेस ह्मणून आमची बाह्य स्थिति व आमच्या अंतःकरणांतील अगम्य खांचकोपऱ्यांत लपून राहिलेल्या पापवासना तूं जाणतोस. तुजपासून कोणतीच गोष्ट लपवितां येत नाहीं. हे सर्वज्ञ, हे हृदयनिवासिन् अन्तरात्मन्, आह्मी तुला नमन करितों.

तूं नित्य परमेश्वर आहेस. तुझ्या स्वरूपाला कोणत्याच प्रकारें मर्यादा नाहीं. तुला आदि नाहीं, तुला अंत नाहीं. तुझ्या गुणांना सीमा नाहीं. तूं महान् आहेस. तूं तेजोराशि आहेस. तूं अगम्य, सर्वव्यापी, आणि अव्यंग आहेस. आमच्या ह्या परिमितस्वरूपी अंत:करणानें तुझ्या अपरिमित स्वरूपाचें आकलन आह्मांस कसें करितां येईल! हे परमपुरुषा, अनाद्यनन्ता, आह्मी तुला नमन करितों.

तूं चेतना, आनंद आणि शांति यांचा प्रभव आहेस. तूं सर्व यातनांचा परिहार करितोस आणि सर्व निर्मिलेल्या प्राण्यांस सुख देतोस. दु:खग्रस्त अंत:करणास तुझ्या संसर्गानें शान्ति आणि सुख हीं प्राप्त होतात. तुझे भक्त तुझ्या नामाचा उच्चार करून शान्तिजन्य सुखाचा अनुभव घेतात. त्वदभावीं खरें सुख नाहीं. हे आनंदकंदा, हे शान्तिप्रदा, आह्मी तुला नमन करितों.

तुझें कारुण्य अपार आहे. पित्याप्रमाणें तूं आमचें रक्षण आणि पोषण करितोस. तूं संकट आणि व्याधि ह्यांपासून आमचें त्राण करितोस आणि पापापासून मुक्त करण्यास नाना उपाय योजितोस. तूं निराश्रितांचा आश्रय आणि पतितांचा पावन आहेस. हे परम दयाळू पित्या, आह्मी तुला नमन करितों.

तूं पवित्र आहेस. तुझें स्वरूप विमल आहे. पापाचा तुला

किमपि स्पर्श व्हावयाचा नाहीं. तूं पतितांचा उद्धार करितोस आणि आपल्या शुद्ध विमल स्वरूपाचा प्रकाश चोंहींकडे पाडितोस. तुझ्या दर्शनानें पाप्यांचीं अंत:करणें विमल होतात. हे शुद्ध पवित्र परमेश्वरा, तूं आमचा पिता, रक्षक, व पावन करणारा आहेस हें पक्केपणें मनांत समजून आह्मी तुला शरण येतों आणि अति लीनतेनें तुझ्यावर सर्व भरंवसा ठेवून तुजला लोटांगण घालितों.

## ध्यान.

सर्वसाक्षी, कृपानिधि, पवित्र, असा परमेश्वर आमच्या हृद-यांत व बाहेर वास करितो. तो आमचा पिता, गुरु आणि कालत्रयीं सखा आहे. आपली वृत्ति शान्त करून क्षणभर त्याचें ध्यान करूं. तो आह्मांवर दया करून आमच्या अंत:चक्षूपुढें उभा राहो आणि आपल्या पावन करणाऱ्या आणि शान्ति देणाऱ्या अशा समागमाचा अनुभव आह्मांस घडेल असें करो.

( यापुढें भक्तांनीं कांहीं वेळ मौन धारण करून परमात्म्याच्या धर्मांचें ध्यान करावें आणि तो साक्षात् आपल्या जवळ वास करीत आहे अशी आपल्या मनाची प्रतीति करावी.)

## प्रार्थना.

हे प्रभो, असत्यांतून आह्मांस सत्याप्रत ने, अज्ञानरूप

अंधकारांतून आह्मांस ज्ञानरूप प्रकाशांत ने. आणि मृत्यूच्या पाशांतुन सोडवून आह्मांस अमृतत्व दे. हे अनंत, सत्यस्वरूपा, आह्मांस साक्षात् भेट दे. तूं दयानिधि परमात्मा आहेस. आपल्या अमर्याद कारुण्यानें आमचें सदा रक्षण कर.

( यापुढें आणखी एक गीत गावें आणि तें संपल्यावर उपदेशकानें कांहीं धर्मपर उपदेश करावा. )

## विशेष प्रार्थना.

हे सर्वव्यापी आत्म्या, पापापासून आह्मांस दूर राख, आणि शान्ति व शुद्धि आह्मांस दे. आमच्या अंतःकरणाच्या दुष्टवासना इतक्या प्रबळ आहेत आणि इंन्द्रियांचें आकर्षण करणारे विषय इतके पुष्कळ आहेत कीं, आमच्या यत्नांनीं त्यांचें निर्मूलन करवत नाहीं, ह्मणून आह्मीं तुला शरण येतों. आह्मी निराश्रित व दुर्बल आहों हें तूं जाणतोस, ह्मणून आमचें रक्षण कर. असत्य आणि भ्रांति यांपासून व कायिक, वाचिक आणि मानासिक पापांपासून आह्मांस मुक्त कर. हे दयाळू प्रभो, आमच्या अंतःकरणाची वृत्ति अशी कर कीं, तूं आमचा पिता व स्वामी आहेस हें त्यांत सदा वागून तुजविषयीं पूज्यत्वबुद्धि उत्पन्न व्हावी आणि आह्मीं तुझी सेवा करावी; आणि प्रत्येक पुरुष आमचा बंधु व प्रत्येक स्त्री आमची भगिनी असें

मानून आह्मीं त्यांजवर प्रीति करावी. स्नेह वाढविणारी व चित्तास शुद्धि आणणारी अशी तुझी सत्ता प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणावर, प्रत्येक कुटुंबावर आणि सर्व पृथ्वीवर बसो. हे मायबापा, आपल्या सुखदायक धर्माचा प्रसार सर्वत्र करून आपल्या लेंकरांस शान्तिसुख दे आणि विमल राख.

(पुढें एक गीत.)

### आशीर्वचन.

आमचा त्राता व आमचा पिता असा जो परमेश्वर तो आमची प्रार्थना मान्य करो, आणि चित्तशुद्धि व चित्तशान्ति ह्यांचा अनुभव सदासर्वकाळ आह्मीं घ्यावा अशी कृपा करो.

(मग एक किंवा त्याहून अधिक गीतें गाऊन आराधनेची समाप्ति करावी.)

---

## उपासना २.

### उद्बोधन.

योदेवोऽग्नौ योऽप्सु यःपृथिव्यां यो विश्वं भुवनमाविवेश।
य ओषधीषु यो वनस्पतिषु तस्मै देवाय नमोनमः॥

अर्थ—जो देव अग्नीच्या ठायीं, जो जलाच्या ठायीं, जो पृथ्वीच्या ठायीं, जो सर्व वृक्षवनस्पति आदिकरून संपूर्ण

जगाच्या ठायीं व्यापून राहिला आहे, त्याप्रत आह्मी वारंवार नमस्कार करितों.

**य एकोऽवर्णो बहुधा शक्तियोगाद्वर्णाननेकान्निहितार्थो दधाति । वि चैति चान्ते विश्वमादौ स देवः स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तु ॥ १ ॥**

अर्थ—जो एक अद्वितीय, निराकार, परमेश्वर ही सर्व नानाविध साकार सृष्टि सप्रयोजन निर्माण करितो, आणि आदीं ज्यापासून सृष्टि निर्माण होते व अंतींही ज्याच्या ठायीं ती लीन होते, तो देव आह्मांस शुभ बुद्धि देवो.

**तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि धियोयोनः प्रचोदयात् ।**

अर्थ—अखिल जगत् निर्माणकर्त्या प्रभूच्या परम मंगलमय स्वरूपाचें मी ध्यान करितों; तो मला सुमति प्रेरण करो.

**स्तवन.**

**सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म॥ आनन्दरूपममृतं यद्विभाति॥ शान्तं शिवमद्वैतं शुद्धमपापविद्धम्.**

तूं खरा साक्षात् परमेश्वर आहेस. तुझ्याच सान्निध्यानें सर्व विश्वास सत्ता प्राप्त झाली आहे. तुजवांचून याची एक क्षणभर सुद्धां स्थिति व्हावयाची नाहीं. तूं सर्व काळीं व सर्व स्थळीं प्रत्यक्ष विद्यमा-

म आहेस. बाह्य सृष्टीमध्यें तूं व्यापकत्वेंकरून व अंतरात्मत्वेंकरून सदैव रहातोस, त्याप्रमाणें अभ्यंतरींही तूं अंतरयामित्वेंकरून राहून सदसद्विवेकाच्या द्वारें आह्मांस आपला मंगलमय आदेश कळवितोस.

तूं चिन्मय, सर्व विश्वाचा आत्मा, आह्मां जीवात्म्यांचा अंतरात्मा, अखंडज्ञानशक्तिपरिपूर्ण आहेस. तुला जडसृष्टीप्रमाणें उत्पत्ति, लय, वृद्धि, क्षय, हीं नाहींत. तूं निराकार, निर्विकार आहेस; अतएव चक्षुरादि बाह्येंद्रियांनीं तुझ्या स्वरूपाचें प्रत्यक्षज्ञान आह्मांस होत नाहीं. परंतु भावदृष्टीनें, ध्यानानें, निर्मळ अंतःकरणाच्या ठायीं एकाग्रतेनें, मनास तुझ्या चिदात्मकस्वरूपाचें प्रत्यक्ष दर्शन होतें. तूं सर्वसाक्षी, आमच्या सर्व अध्यात्मिक वृत्ति पहातोस, त्यांतील पापमल धुवून काढ; विषयासक्ति दूर कर; आणि आमचें अंतःकरण तूं आपल्या स्वरूपामध्यें निमग्न कर.

तूं अनंतस्वरूप आहेस. देशकालादि मर्यादा तुला नाहींत. तूं अखंड, अनंत, कल्याणगुणनिधान आहेस. कोणच्याही काळीं व कोणत्याही स्थळीं आह्मी तुझें स्मरण केलें असतां तूं आमचा आश्रयदाता, पावनकर्ता, सन्मित्र आहेस. यास्तव आह्मीं कोणत्याही अवस्थेंत असलों, कितीही संकटांत पडलों,

तरी बालक जसें मातेच्या अंकीं निर्भय रहातें त्याप्रमाणें आह्मीं तुझ्या कृपेच्या आश्रयानें निर्भय रहावें.

तूं परब्रह्म, सर्वश्रेष्ठ, अखंडैश्वर्यसंपन्न ! अपार तुझा महिमा, अतर्क्य तुझें चातुर्य, जिकडे पहावें तिकडे स्पष्ट दिसत आहे. तूं परमपूज्य आराध्यदेवता आहेस. आह्मीं अत्यंत विनम्रभावें तुझ्या आराधनेंत तत्पर असावें. तुझें अनुल्लंघ्य शासन, तुझा अनुल्लंघ्य आदेश, शिरसा वंद्य करून, तुझीं आज्ञांकित बालकें होऊन राहूं, ह्मणजे आह्मांस कशापासूनही भय वाटणार नाहीं.

तूं आनंदस्वरूप, आनंदकंद, आनंददाता, तुजवांचून अन्यत्र खरा आनंद कशांत आहे? या जगामध्यें ज्या ज्या वस्तूंमध्यें आह्मां जीवांस यत्किंचित् आनंद देण्याची शक्ति आहे, ती त्यांस तुजपासूनच प्राप्त झाली आहे. ह्या सृष्टीचें मनोहर स्वरूप, पुष्पादिकांचा सुगंध, फळांचें माधुर्य, पक्ष्यादिकांचे मधुरध्वनि, वायूचा उत्साहकारक स्पर्श, मातापितरांचें अनुपमेय प्रेम, स्त्रीपुत्रकन्या यांची ममता, बंधु, आप्त, इष्टमित्र, यांचा स्नेह, सज्जनांची अखंड दया, हीं सर्व आमच्या आनंदाचीं साधनें तूंच आह्मांस दिलीं आहेस. तुझ्याच अनुकूलतेनें ह्या सर्वांपासून आह्मांस आनंद होतो. तुझी अवकृपा

होऊन चित्त दुःखित झालें असतां आमचा आत्मा निरुत्साह होतो, आणि त्यास कशापासूनही आनंद होत नाहीं. यास्तव आह्मी सदैव चित्त निर्मळ ठेऊन त्यामध्यें तुला सांठवूं, ह्मणजे आनंद आह्मांस कधींही दुर्लभ होणार नाहीं. तूं जो आनंद-सिंधु त्या तुजसमागमें आह्मी सदैव आनंदांत राहूं.

तूं अमृतस्वरूप, अमृतधाम. तुझ्या नित्यसहवासाचा आह्मांस लाभ व्हावा, हेंच आमच्या आत्म्याचें खरें अमृतत्व होय. हीच आमची मोक्षप्राप्ति, हाच आमचा परमार्थ. येणेंकरूनच आह्मीं कृतार्थ होऊं, आणि आमचें जीवन सफल होईल.

तूं शांतिस्वरूप, शांतिनिधान ! कामक्रोधादि विकारांच्या योगानें व क्षणोक्षणीं घडणाऱ्या अनेक अनिष्ट गोष्टींच्या योगानें आमच्या जीवास जो उद्वेग होतो, तो केवळ तुझ्याच समागमानें नाहींसा होतो. तुझ्याच समागमानें आह्मी अचल शांतीचा अनुभव घेऊं.

तूं अनंत, कल्याणगुणनिधान ! धनद्रव्यादि कोणत्याही बाह्य विषयाच्या प्राप्तीनें आमचें शाश्वत कल्याण होणार नाहीं. तुझी प्राप्ति हेंच आमचें खरें कल्याण. तुझी कृपा आह्मांस परम श्रेयस्कर. कोणत्याही लौकिक सुखाकरितां तूं जो आमचा कल्याणकर्ता, त्या तुझा आह्मी परित्याग करणार नाहीं,

तूं अद्वितीय परमात्मा! तुजसमान अन्य कोणी नाहीं. मग तुजपेक्षां श्रेष्ठ कोण? तूंच एक ह्या सर्व जगाची देवता तुझा दिव्यभाव तुझ्या प्रत्येक शक्तींमध्यें व प्रत्येक तत्वामध्यें दिसतो; तेणेंकरून मनुष्यांस मोह पडून या सर्व भिन्न भिन्न देवता आहेत असें वाटतें. परंतु तूंच एक आपली अखंड, अनंत, अचिंत्य, अप्रतिम शक्ति सर्वत्र प्रकाशित करीत आहेस; ह्मणून तूं आह्मांस एकच पूज्य दैवत. आमचें चित्त अनन्यभावेंकरून तुझ्या ठायीं सुप्रतिष्ठित होवो.

तूं शुद्ध मंगलस्वरूप! तुझे मंगल हेतु सर्व जगांत स्पष्ट दिसून येत आहेत. तुझा मंगल आदेश विमल अंतःकरणास निर्विवाद कळत आहे. तो आदरपूर्वक ग्रहण करून आह्मी जगांत वर्तलों असतां अपवित्र भाव अंतःकरणांत आश्रय करूं शकणार नाहीं. तुझ्या समागमें राहून अखंड शुद्धभाव आह्मीं अनुभवूं.

(मौन धारण करून ध्यान करणें.)

### प्रार्थना.

असतो मा सद्गमय तमसो मा ज्योतिर्गमय मृत्योर्माऽमृतं गमय आविराविर्मएधि रुद्र यत्ते दक्षिणं मुखं तेन मां पाहि नित्यम् ॥

अर्थ—हे देवा, असत्य, भ्रांति, आणि मोहपाश, यांपासून आह्मांस सोडवून तूं आपल्या सत्यस्वरूपाचें सदैव दर्शन दे. अज्ञानांधकारांतून आणि अविवेकापासून सोडवून आमच्या अंतःकरणांत विवेक जागृत ठेव; आणि यथार्थज्ञानानें आमचें अंतःकरण निर्मल कर. पापासक्तिरूप मृत्यूपासून सोडवून शुद्ध, अपापविद्ध, शाश्वत, आणि अमृतरूपी जें तुझें सन्निधान तें आह्मांस प्राप्त होऊं दे. हे देवा, तूं सदैव आमच्या अंतःकरणांत आविर्भूत होऊन रहा. हे सर्वशास्त्या प्रभो, तूं आपल्या कृपाकटाक्षानें आमचें सदा रक्षण कर.

( धर्मोपदेश. )

## विशेष प्रार्थना.

( येथें प्रसंगानुरूप जी विशेष प्रार्थना करणें असेल ती करावी. )

**पिता नोऽसि पिता नो बोधि । विश्वानि देव सवि-**
**तर्दुरितानि परासुव । यद्भद्रं तन्न आसुव ॥**

अर्थ—हे देवा, तूं आमचा परम पिता आहेस. तूं आमचें पितृवात्सल्यानें रक्षण कर. हे जगत्कर्त्या प्रभो, तूं आमच्या सर्व दुरितांचा संहार कर, आणि ज्यांत आमचें कल्याण तें आह्मांस प्राप्त होऊं दे.

**अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।**
**तस्मात्कारुण्यभावेन रक्ष मां परमेश्वर ॥ १ ॥**

अर्थ—हे परमेश्वर, मला ह्या भवसागरांत तुजवांचून अन्य कोणी त्राता नाहीं; तूंच माझा एक आश्रयदाता आहेस; यास्तव कारुण्यभावानें माझें सदा रक्षण कर.

**अपराधसहस्राणि क्रियन्तेऽहर्निशं मया ।**
**दासोऽहमिति मां मत्वा क्षम्यतां परमेश्वर ॥१॥**

अर्थ—हे परमेश्वरा, मजकडून सहस्रावधी अपराध घडतात, परंतु मी तुझा दीन सेवक आहें. माझ्या दुर्बलतेकडे पाहून मला क्षमा कर.

**मन्त्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं परेश्वर ।**
**यत्पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तु मे ॥ १ ॥**

अर्थ—हे परमेश्वरा, मी ज्ञानशून्य. तुझें स्तवन कसें करावें हें मला समजत नाहीं. तुझें प्रीय कार्य मजकडून सतत घडत नाहीं. सप्रेमभक्ति माझ्या अंतःकरणांत दृढ होत नाहीं, तथापि मी यथामति जी तुझी उपासना केली ती तुला ग्राह्य होवो. ॐ शांतिः शांतिः शांतिः

# उपासना ३.

## उद्बोधन.

सर्वेषु कालेषु समस्तदेशेष्वशेषकार्येषु तथेश्वरेश्वरः ॥
सर्वैः स्वरूपैः स्तुतिमाननादिस्सनोऽस्तु माङ्गल्य विवृ-
द्धये हरिः ॥ १ ॥

अर्थ—अनाद्यनंत सर्वेश्वर परमात्मा ज्याची भक्तांनीं अने-कप्रकारें स्तुति केली आहे तो सर्व कार्यांमध्यें, सर्व कालीं आणि सर्व स्थलीं आह्मांस मंगलवृद्धिकारक होवो.

या सर्व इंद्रियगोचर व अध्यात्मिक सृष्टीचा कर्ता व शास्ता प्रभु सर्वत्र सर्वकाळ विद्यमान आहे. ज्यांचीं चित्तें श्रद्धेनें निर्मल झालीं आहेत त्यांस तो अंतर्बाह्य प्रत्यक्ष दिसत आहे. आपल्या जीवनास अधारभूत जी ही पृथ्वि, आपला प्राण संरक्षण करणारा जो हा वायु, आपली तृषा शांत करणारें जें हें उदक, व डोळ्यांस नानाविध चित्रविचित्र सुंदर सृष्टि दाखवून चित्त सुप्रसन्न करणारें जें हें तेज, हीं सर्व ज्यानें आपल्या इच्छामात्रेंकरून आह्मां प्राण्यांच्या सुखार्थ योजिलीं आहेत व ज्याणें आपल्या सुखार्थच हे विषय ग्रहण करण्यास समर्थ, अशीं इंद्रियेंही आपल्यास दिलीं आहेत असा जो सर्वसमर्थ अनुपमेय, दयामय, अखंड मंगलगुणनिधान, विश्वात्मा व आमचा

अंतर्यामी त्याची उपासना आपण करूं या. अंतःकरण बाह्य व्यावृत्तींतून काढून, त्यांतील वासनामळ धुवून एकाग्र चित्त व शुचिर्भूत होऊन, त्याच्या पवित्र गुणांचें ध्यान करून, व त्याचें प्रेममय दर्शन घेऊन त्यास निष्कपट मनानें आत्मनिवेदन करूं या, व त्याचा अनुग्रह संपादून, व त्याचें साह्य मागून हें जीवन सफल करूं या.

### स्तवन.

अद्रेश्यम् अग्राह्यं आपाणिपादं नित्यं विभु सर्वगतं सुसूक्ष्मं अव्ययं भूतयोनि कविर्मनीषी परिभूः स्वयंभूः सत्यकामस्सत्यसंकल्पः

हे जगन्नियंत्या परमेश्वरा, तुला देशकालादि मर्यादा नाहींत ह्मणून तूं अमुक ठिकाणीं आहेस आणि अमुक ठिकाणीं नाहींस, अथवा अमुक काळीं आहेस आणि अमुक काळीं नाहींस असा निर्बंध करितां येत नाहीं. तूं सर्वत्र सर्व काळीं आहेस. तुला कांहीं एखादें विशेष नाम किंवा विशेष रूप किंवा विशेष आकार इत्यादि आहे असें नाहीं. ह्मणून तूं बाह्येंद्रियांस गोचर नाहींस. तथापि अंतर्निहित सूक्ष्म बुद्धीस तुझें आपाततः ज्ञान होतें तुला आमच्याप्रमाणें हस्तपादादि अवयव नाहींत तथापि तूं केवळ ज्ञानस्वरूपी परमात्मा हें सर्व जग वर्तवितोस. तूं

शाश्वतस्वरूपी, निर्विकार, सर्वव्यापी, परमात्मा आहेस. तूं अखंड-ज्ञानशक्तिपरिपूर्ण आहेस. तुझ्या ज्ञानदृष्टीस आमचीं सर्व बाह्य आचरणें व आमच्या अध्यात्मिक सर्व वृत्ति अखंड दिसत आहेत. तूं अनाद्यनंत, स्वतःसिद्ध. तूं जें मनांत आणितोस तें सिद्धीस जातें. तूं नेहमीं सत्यप्रिय, सत्यनिष्ठ, सत्यस्वरूप आहेस.

हे परममंगलस्वरूपा मायबापा, अतर्क्य तुझा महिमा ! थोर थोर कवींनींही त्याचें वर्णन करण्याचा यत्न केला तथापि ते थकले ! ज्या ह्या पृथ्वीवरील नानाविध पदार्थ पाहून आह्मांस मोठा चमत्कार वाटतो, व त्यांच्या स्थितीचें यत्किंचित् ज्ञान झालें तथापि त्याचा आह्मांस अभिमान वाटतो, जिज-वरील विषयांचें ग्रहण करून तज्जन्य सुखांमध्यें आह्मी इतके निमग्न होऊन जातों, ती पृथ्वि ज्या सूर्यमालेमध्यें अवयव-रूपानें आहे, त्या सूर्यमालेसारख्या अनंत ब्रह्मांडांच्या माला ज्या ह्या विश्वामध्यें सांठविल्या आहेत, अशा ह्या अचिंत्य विश्वाचा रचयिता व शास्ता जो तूं त्या तुझा महिमा या दुर्बल मनुष्यवाणीनें काय वर्णन करावा ! या तुझ्या महिम्याचें आह्मांस अंशतः ज्ञान होतें, त्याच्या योगानें आमचें अंतःकरण अति विस्मित होऊन परमपूज्य बुद्धीनें युक्त होतें. ही पूज्यबुद्धि सतत जागृत राहून तुझें स्मरण झालें असतां अंतः-

करण तत्काल अत्यंत विनीत होतें. अनुपमेय तुझी करुणा जगदीश्वरा ! आह्मी अति हीन, दीन, रंक असे प्राणी असतांही आमच्या ऐहिक सुखांविषयीं किती विलक्षण तुझी योजना ! आह्मी यांतच मोहून राहिलों तर आमचें जीवन केवळ पशुवत होऊन आमच्या शाश्वत सुखाच्या अधिकारी आत्म्यचें पारमार्थिक कल्याण होणार नाहीं ह्मणून आह्मांस या मोह पाशांतुन सोडविण्याकरितां आपलें पवित्र स्वरूप नानाप्रकारें करून आह्मांस दाखवितोस, व आपल्या दयेचीं लक्षणें आमच्या दृष्टीस पाडतोस. आह्मांस कल्याणाचा मार्ग दाखविण्याकरितां आमच्या अंतःकरणांत गुप्त राहून आपला पवित्र आदेश आह्मांस कळवितोस. हे तुझे अगणित उपकार स्मरले ह्मणजे अंतःकरण कृतज्ञतेनें व्याप्त होतें व त्यास प्रेमाचा पाझर सुटतो. हे भगवन्, तूं कृपा करून आह्मां मंदमती जीवांस आपल्या परम सूक्ष्म, सर्वव्यापी, सर्वांतर्यामी मंगलमयस्वरूपाचें दर्शन दे.

(मौन धारण करून ध्यान.)

## प्रार्थना.

हे आमच्या खऱ्या हितकारी देवा, हे दयामय पित्या, हे प्रेममयी माते, आमच्या अंतःकरणांत तुजविषयीं प्रेम दिवसानुदिवस वाढून आमचें जीवन आनंदमय होवो. तुझा मंगलमय

आदेश आणि आमची इच्छा एकरूप होवो. आमचा आत्मा तुझे ठायीं एकनिष्ठ होवो. तुझ्या परम वात्सल्याचें भान आह्मांस सतत राहून आमचा लेकुरभाव सतत राहो. तुझ्याठायीं अचल भावाच्या योगानें आमचें मन निर्भय असो. तुझ्या अति विमल स्वरूपाच्या सन्निधानानें आमच्या वृत्ति निष्पाप होवोत. तुझें सर्वांविषयीं प्रेम आमच्या हृदयांत बिंबून त्यांच्याविषयीं आमचाही प्रेमभाव दिवसानुदिवस वृद्धिंगत होवो. देहरक्षणाविषयीं आमची जी कळकळ आहे तिजपेक्षां आत्मोन्नतींविषयीं कळकळ विशेष होवो. आणि त्वां हें दिलेलें जीवन सर्व प्रकारें कृतार्थ होवो.

---

(धर्मोपदेश व नंतर विशेष प्रार्थना व आशीर्वचन.)

## उपासना ४.

### उद्बोधन.

सर्वकाळ प्रपंचांत मग्न झालेलें मन ह्या वेळीं अन्य सर्व विषय सोडून सर्वशक्तिमान् मंगलमय परमात्म्याच्या भजनांत तल्लीन होवो. तो जगदात्मा आमच्या हृदयमंदिरांत वास करीत आहे, त्याचा आह्मांस अनुभव येवो.

### स्तवन.

सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म ॥ आनन्दरूपममृतं यद्विभाति ॥
शान्तं शिवमद्वैतं ॥ शुद्धमपापविद्धम् ॥

तूं सत्य, तुझी सर्व ठिकाणीं जीवंत व गंभीर सत्ता आहे. तूं सर्व विश्वाचें आश्रयस्थान, तूं चेतन व अचेतन अशा सर्व पदार्थांचा मूलाधार. तुझ्या योगानें आम्हीं जिवंत राहून वास करितों. तुजवांचून सर्वहि असार व मिथ्या आहे. हे सर्वत्र विद्यमान ईश्वरा! तूं आमच्या जीवनाचें जीवन आहेस.

तूं ज्ञानरूप, तुझें अपार ज्ञान जळीं, स्थळीं व आकाशांत प्रतिबिंबून राहिलें आहे. चोहोंकडे कसें सुंदर कौशल्य व आश्चर्यकारक नियम दिसताहेत! आम्हांवर तुझे असंख्य ज्ञान-चक्षु लागून राहिले आहेत. आमचीं बाह्य व आंतरिक सर्व पापें तूं पाहत आहेस. तुझ्या या दृष्टीच्या उजेडांत आम्ही कोठेंही लपूं शकत नाहीं. तूं सर्वज्ञ, तूं अंतर्यामी व सर्वसाक्षी आहेस.

तूं अनंत, तुला आरंभ नाहीं, तुला समाप्ति नाहीं. तूं काळेंकरून नित्य, देशेंकरून सर्वव्यापी; तुझ्या उच्चतेचें व गंभीरतेचें परिमाण कोण करील? हें विशाल विश्व तुझ्या पायांखालीं मोहरीच्या कणासारिखें आहे. तूं इंद्रियांस अगोचर, तूं विचारास अतीत, तूं पूर्णब्रह्म आहेस.

तूं आनंद, अमृत, आणि शांतीची खाणी आहेस. तूं दुःखितास सुखी करितोस. तूं तापलेल्या प्राणास शीतल करि-

तोस. तूं अमृत होऊन मृत्यूच्या यातनांचा परिहार करितोस. तुला पाहिलें असतां, तुझी मधुर कथा ऐकिली असतां, व तुझ्याजवळ बसलें असतां हृदय फारच शीतल होतें. तूं सुखसिंधु व हृदयरंजन आहेस.

तूं शिव व मंगल आहेस. अनंत मुखांनीं हें जगत् तुझ्या दयेचा महिमा वर्णीत आहे. बापाप्रमाणें आह्मांस तूं स्नेहानें व नानाप्रकारच्या योजनांनीं पोषितोस, व अन्न,वस्त्र व ज्ञान देऊन आह्मांस सुखी करितोस. जे तुला मानीत नाहींत त्यांवरही तूं ममता करितोस. दुःखग्रस्त पाप्यांचा तूंच सहाय आहेस. तूं दयाळू, वत्सल व प्रेमसिंधु आहेस.

तूं अद्वितीय! तुजशिवाय तुजसमान दुसरा कोणी नाहीं. हें समस्त विश्व तूं एकट्यानेंच उत्पन्न केलेंस. तूं एकटा या सर्वांचें रक्षण व शासन करीत आहेस. असंख्य जीवांचा, अगण्य आत्म्यांचा, तूं एकच आश्रयदाता होस. चोहोंकडे केवळ तुझ्याच नांवाचा जयध्वनि उठत आहे. तूं सर्वांचा राजा, सर्वांचा प्रभु, तूंच एक आमचा सहाय व भरंवशाचें स्थान आहेस.

तूं शुद्ध, अपापविद्ध, व निर्मळस्वभाव आहेस. तुझी इच्छाच पुण्याचा आदर्श आहे. तुझ्या पुण्याचें तेज असें आहे कीं, त्याचा एक किरण प्राप्त झाला असतां पाप्याच्या हृदयांतील

अंधकार दूर होतो. तुला एकदां मनांत आणिलें असतां जीवन पवित्र होतें. हे धर्ममूर्ते! तुझ्या भयानें पाप पलायन करितें. तुझ्या न्यायाच्या विचारासमोर पापी कधीं आश्रय पावत नाहीं. तुझ्या अधिकारानें दुष्टाचें दमन होतें. तूं पुण्याचा सूर्य, धर्माचें स्थान, व पाप्याचा परित्राता आहेस. हे देवा! आह्मीं सर्व तुला शरण आलों आहों. ऐहिक व पारत्रिक कल्याणाकरितां तुजवर भार घालितों. तूं आमचा स्तवनीय व संभजनीय आहेस. हे जगदीश! आह्मीं तुला वंदन करितों. हे दीनबंधो, सकल कुटुंबाच्या पित्या, पाप्यास तारणाऱ्या, आह्मी तुला नमस्कार करितों.

## ध्यान.

ज्याची आह्मीं सर्वांनीं आराधना केली त्याचें आह्मी ध्यान करितों. या देहमंदिरांत हृदयामध्यें तोच अंतरात्मा सर्वदा अधिवास करीत आहे. तो चक्षूंचा चक्षु, कर्णांचा कर्ण, मनाचें मन, व प्राणाचा प्राण आहे. तो चिरकाल आह्मांपाशीं असून आमचें रक्षण करितो. तो आमचें अनंत जीवन. हें जड जगत् सोडून, बाहेरील सर्व व्यापार विसरून एकांत हृदयराज्यांत आह्मी प्रवेश करितों. तेथला अंधकार नासून

हृदयाच्या खोल स्थानीं प्रेमाच्या आसनावर प्रेमनाथाला पाहून व पवित्र होऊन त्याच्या अनंत सहवासास आह्मीं योग्य होऊं.

( सर्वांनीं कांहीं काल स्तब्ध राहून ध्यान करावें. )

### प्रार्थना.

असत्यापासून आह्मांस सत्याप्रत ने; अज्ञानांधकारांतून आह्मांस ज्ञानरूप प्रकाशांत आण; आणि मृत्यूपासून आह्मांस अमृतत्वाप्रत घेऊन जा. हे सत्यस्वरूपा! आह्मांपाशीं तूं प्रकाशित हो. हे दयाळा! तझी जी अपार करुणा तिच्या द्वारें आमचें सर्वदा रक्षण कर.

हे कृपाळा! तूं आह्मांस तुझ्या चरणांचा आश्रय दे. आह्मी सर्व भाऊ व बहिणी मिळून श्रद्धेनें व भक्तीनें तुझ्या मुक्तिप्रद चरणांस प्रणाम करितों.

( नंतर एक पद्य गाऊन उपदेशकानें धर्मपर उपदेश करावा व शेवटीं विशेष प्रार्थना करणें असेल ती करून पुनः एक पद्य गावें आणि शेवटीं आशीर्वचन ह्मणून उपासनेची समाप्ति करावी. )

---

## उपासना ५.

### उद्बोधन.

स्वभावमेके कवयो वदन्ति कालं तथान्ये परिमुह्यमानाः ।
देवस्यैष महिमा तु लोके येनेदं भ्राम्यते ब्रह्मचक्रम् ॥ १ ॥

येनावृतं नित्यमिदं हि सर्वं ज्ञः कालकारो गुणी सर्वविद्यः ।
तेनेषितं कर्म विवर्तते ह पृथ्व्यप्तेजोनिलखानि चिन्त्यम्॥२॥

अर्थ– कोणी पंडित मूढ होत्साते स्वभाव हेंच कारण ह्मणतात; कोणी काल हेंच कारण ह्मणतात; परंतु तसें नव्हे. तो देवाचा महिमा आहे, ज्याच्या योगें हें ब्रह्मचक्र भ्रमण करीत आहे. ॥१॥ त्या देवाचा महिमा हा–जो सदा सर्वकाळ ह्या विश्वास व्यापून राहिला आहे, जो ज्ञानस्वरूप, कालाचाही कर्ता, सर्व गुणांनीं संपन्न आणि सर्वज्ञ असा आहे. त्याच्याच आज्ञेनें पृथ्वि, आप्, तेज, वायु, आणि आकाश हीं पंच भूतें आपापलीं कर्में करितात; त्याचेंच आह्मांस चिंतन करणें आहे. ॥ २ ॥

अस्मिन् द्यौः पृथिवी चान्तरिक्षमोतं मनः सह प्राणैश्च सर्वैः। तमेवैकं जानथ आत्मानमन्या वाचो विमुञ्चथ अमृतस्यैष सेतुः ॥ १ ॥

अर्थ– याच्या ठायीं आकाश, पृथिवी, अंतरिक्ष, आणि सर्व प्राणांसहित मन हीं ओविलीं आहेत. त्याच एका आत्म्याला जाणा. दुसरीं सर्व भाषणें सोडून द्या. तोच मोक्षाप्रत जाण्याचा सेतु आहे.

अपाणिपादो जवनो ग्रहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्ण ॥
स वेत्ति वेद्यं न च तस्यास्ति वेत्ता तमाहुरग्र्यं पुरुषं महान्तम्॥

अर्थ– त्याजला हात नाहीं, पाय नाहीं, तथापि तो शीघ्र ग्रहण करितो, डोळे नसून पाहतो, कर्ण नसून ऐकतो, सर्व-ज्ञेय जें तें तो जाणतो, परंतु त्याजला जाणणारा कोणी नाहीं. त्याला महान् आदिपुरुष असें ह्मणतात.

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम् ॥
सर्वस्य प्रभुमीशानं सर्वस्य शरणं बृहत् ॥ १ ॥

अर्थ–सर्व इंद्रियसामर्थ्याच्या योगें होणारें ज्ञान त्याला होतें, तथापि सर्व इंद्रियांनीं विरहित तो आहे. सर्वांचा प्रभु, सर्वांचा राजा, सर्वांचा मोठा रक्षणकर्ता तोच.

याप्रमाणें जो या निःसीम, भव्य, अशा ब्रह्मांडाचा उ-त्पन्नकर्ता, जो या विश्वाच्याठायीं सतत विराजमान आहे, ज्याचें अनादि, अनंत, आनंदमय, मंगल, प्रेममय, गंभीर, उन्नत, असें स्वरूप पहाण्याचें सामर्थ्य ज्याला आहे त्याजला या आकाशमंडलाच्याठायीं, भूमि आणि समुद्र, पर्वत आणि दरी, पशु आणि पक्षी, ह्यांच्याठायीं, मनुष्याच्या अंतः-करणामध्यें, मनुष्यांचा जो आजपर्यंत एकसारखा व्यवहार चालत आला आहे त्यामध्यें स्पष्टपणें दृश्यमान होतें, आणि जोच एक या दुस्तर प्रपंचाच्याठायीं आपल्या अंतः-

करणास धैर्य देणारा, सर्व संकटांतून पार पाडून शांति देणारा, जोच अनेकविध आमचीं कर्तव्यें करण्यास आह्मांस सामर्थ्य देणारा, जोच एक सर्व प्रकारें आमचा सुहृत्, आमचा मायबाप, आणि आमचा गुरु, त्या परात्पर परमेश्वराची आराधना करूं या. तदर्थ प्रापंचिक सर्व विषयांपासून आपली चित्तवृत्ति काढून घेऊन, त्याच्याठायीं अर्पण करूं. तो कृपानिधि या क्षणीं तरी आमचें अंतःकरण आपणापाशीं आकृष्ट करून ही आराधना सफल करो.

(पुढें ज्यांत परमेश्वर द्वितीय पुरुषीं असेल असें स्तवनपर गीत गावें.)

## स्तवन.

द्यावाभूमी जनयन् देव एकः ॥१॥ (ऋक्संहिता.)

ज्ञः सर्वगो भुवनस्यास्य गोप्ता य ईशोऽस्य जगतो नित्यमेव॥२॥

(श्वेताश्वतर.)

अजं ध्रुवं सर्वतत्त्वैर्विशुद्धं ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥३॥

(श्वेताश्वतर.)

एको देवः सर्वभुतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा ॥ कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षी चेता केवलो निर्गुणश्च ॥४॥ (श्वेताश्वतर.)

एष आत्मा अपहतपाप्मा सत्यकामः सत्यसंकल्पः ॥५॥
(छान्दोग्य.)

सत्यमेवेश्वरो लोके ॥६॥ (रामायण.)

आनन्दो ब्रह्म (तैत्तिरीय उपनिषद्.)

पितासि लोकस्य चराचरस्य ॥७॥ (भगवद्गीता.)

द्यावाभूमी जनयन्देव एकः– हे परमात्मन्, हें सर्व विश्व त्वां उत्पन्न केलें, आणि एका काळीं सर्व उत्पन्न करून आपण एकीकडे राहिलास अशा प्रकारची तुझी सृष्टि नव्हे, तर सतत या विश्वाच्या ठायीं वर्तमान असून अनादिकालापासून उत्तरोत्तर अधिकाधिक अद्भुत सृष्टि करीत आहेस. तुझा सृष्टीचा व्यापार आजपर्यंत एकसारखा चालत आला आहे, आणि तो पुढेंही चालत राहील. तत्ववेत्ते सांगतात कीं, पूर्वीं केवळ ही पृथ्वि अरण्यमय होती; प्रचंड वृक्षांशिवाय दुसरें कांहीं नव्हतें. तदनंतर, विलक्षण अजगरासारिखे प्राणी, पुढें त्यांच्याहीपेक्षां चांगले, याप्रमाणें उत्तरोत्तर अधिकाधिक चांगली अशी उत्पत्ति कारितां कारितां शेवटीं आह्मांसारिख्या मनुष्यांस त्वां निर्माण केलें, आणि अशा प्रकारची बुद्धि दिली आणि आपणांस ओळखण्याचें ज्ञान दिलें, कीं त्या प्रकारची बुद्धि आणि ज्ञान दु-

सऱ्या निर्मिलेल्या प्राण्यांस नाहीं. अतएव किती तुझी आह्मां दीनांवर कृपा! विनम्रभावें जगदात्मन् आह्मी तुझे आभार मानितों.

**य ईशेऽस्य जगतो नित्यमेव**—अशा प्रकारें हें अद्भुत विश्व, ही पृथिवी, चंद्र, सूर्य, आणि अगणित जे हे तारे, जे मोठमोठाले प्रचंड गोलच आहेत—एवढ्या महत्वाचे कीं, त्यांजपुढें ह्या आमच्या विशाळ पृथ्वीची समुद्रकांठावरील वाळवंटांतील एका वाळूच्या कणाची जी योग्यता तेवढीच आहे,—हीं सर्व उत्पन्न करून तूं त्यांचें शासन करितोस. तूं ह्या निःसीम विश्वाचा राजा, प्रभु, स्वामी. सर्व कांहीं तुझ्याच इच्छेनें विश्वामध्यें घडून येतें. तुझें सामर्थ्य अपरिमेय आहे, तें आह्मांस पूर्णपणें कळावयाचें नाहीं. आजपर्यंत अनेक बुद्धिशाली मनुष्यांनीं विचार केला, परंतु तुझा पार लागला नाहीं. हें सर्व प्रचंड विश्व तुझ्या मोठेपणाची साक्ष देतें. हें सर्व तुझें वैभव पाहून पूज्यबुद्धानें विनम्रभावेंकरून आह्मीं तुजला लोटांगण घालितों.

**भुवनस्यास्य गोप्ता**— आणि तूं याचें प्रेमानें संरक्षण करितोस. आपल्या ह्या विश्वाचा नाश होऊं नये, उत्तरोत्तर वृद्धि व्हावी, उत्तरोत्तर वाईट नष्ट होऊन चांगलें प्रवृत्तींत

यावें, कुरूप जें आहे तें नष्ट होऊन सुंदर जें त्याची प्रवृत्ति व्हावी, ह्याविषयीं तुझ्या अनेक योजना सर्वत्र दृष्टीस पडतात. सर्व प्राणिमात्रांचा विचार केला असतां नवीन प्राणी उत्पन्न व्हावयाच्या पूर्वींच त्यांचा निर्वाह व्हावा एतद्विषयीं तूं रचना करून ठेवितोस; त्याच्याच योगें ते प्राणी पुढें वाढून त्यांस त्वां नेमून दिलेलें कर्तव्य करावयास ते समर्थ होतात. याप्रमाणें सर्व इतर प्राण्यांच्या आणि आह्मां मनुष्यांच्या शरीराची वृद्धि व्हावी एतदर्थ तुझ्या विलक्षण योजना चोहींकडे आहेत इतकेंच नव्हे, तर आमचा जो हा आत्मा त्याचीही वृद्धि व्हावी, त्याला शुभ संस्कार लागावे, त्याजमध्यें उन्नत विचार उदित व्हावे, आणि अनादिअनंत जो तूं त्या तुझें ज्ञान त्याजला व्हावें, तुझ्याठायीं त्याणें रत व्हावें एतदर्थ त्याच्या अंत:करणामध्यें सत्यासत्य, शाश्वताशाश्वत, नित्यानित्य, योग्यायोग्य, अशा प्रकारचें ज्ञान ठेऊन बाह्य विश्वासही सुंदर, उन्नत, आनंदमय असें स्वरूप दिलें आहेस, तेणेंकरून केवळ शारीरकृत्यांच्या योगेंकरूनच तो संतुष्ट न होतां परात्पर जो तूं शाश्वत पुराणपुरुष त्या तुझ्या ज्ञानाविषयीं त्याजेला उत्कंठा प्राप्त होते. सत्यमेव तूं आमची माता, तूं आमचा पिता. असा जो तूं त्या तुजला पितृभक्तीनें आह्मीं प्रणाम करितों,

अजं ध्रुवं—तूं अज आहेस, तुला जन्म नाहीं, तूं कशावर अवलंबून नाहींस. तूं स्वतंत्र, तूं शाश्वत, तुजला विकार नाहीं. सृष्टींतील सर्व पदार्थ नानाप्रकारचे विकार पावतात, ते नश्वर आहेत, आज जें आहे तें उद्यां नाहीं किंवा आज जसें आहे तसें उद्यां नाहीं, हा प्रकार चोहींकडे दिसून येतो. परंतु याच अशाश्वताच्या योगें तुझ्याच कृपेनें, तुझ्याच प्रेरणेनें आह्मीं मनुष्य तूं जो शाश्वत आणि अव्यय त्या तुजला शोधून काढितों. आजपर्यंत आह्मांसारिखे मनुष्य असंख्य झाले, आह्मांसारिखाच प्रपंच करून इहलोक सोडून अन्यत्र गेले, त्यांचें नांव सुद्धां आतां कोठें नाहीं; याचप्रमाणें आह्मीही, आमचा काळ येईल तेव्हां हा सर्व पसारा सोडून अन्यत्र जाऊं. जड पदार्थांचींही याच प्रकारचीं अनेक रूपांतरें होतात. आज ज्या ठिकाणीं भूमि त्या ठिकाणीं कालांतरीं समुद्र, ज्या ठिकाणीं मोठमोठाल्या नगरी त्या ठिकाणीं घोर अरण्य, अशा प्रकारची अवस्था आहे. परंतु तूं मात्र शाश्वत, तूं मात्र नित्य, सर्वकाळीं जशाचा तसाच. या शरीराचीं जीं हीं रूपांतरें आणि नाश त्यांच्या योगें भयभीत झालेले जे आह्मी ते अनश्वर जो तूं त्या तुला शरण येतों.

ज्ञः—तूं ज्ञानस्वरूप आहेस, जड जें दिसतें त्याहून तूं अ-

त्यंत भिन्न, काष्ठ पाषाण तूं नव्हेस, तुला डोळे नाहींत तथापि तूं पहातोस, कान नाहींत तथापि ऐकतोस, हस्तपाद नाहींत तथापि ग्रहण करितोस, चैतन्यस्वरूप तूं असून शरीराच्या योगें होणारीं सर्व कार्यें तूं करितोस, तूं आह्मांशीं जो व्यवहार करितोस तो हस्तपादादि बाह्य साधनांनीं नव्हे, तर ज्ञानस्वरूप तूं अंतर्यामाच्या ठायीं प्रकट होऊन प्रार्थिलेलें फळ आह्मांस देतोस; हृदयामध्यें आनंद उदित करितोस आणि शांति देतोस. तूं केवळ अंतःकरणानें ग्राह्य, बाह्य इंद्रियांच्या द्वारें तुझें ग्रहण व्हावयाचें नाहीं, असा जो तूं ज्ञानस्वरूप, शांत अंतःकरणामध्यें दृश्य, त्या तुजला नमन करितों.

**सर्वगः—सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा**—तुला देश आणि काळ ह्यांची मर्यादा नाहीं. तूं आमच्या अत्यंत सन्निध आहेस असंख्य योजनें दूर असे जे आकाशांत गोल भ्रमण करीत आहेत, त्या ठिकाणीं आहेस. तूं सर्वांचा साक्षी आहेस. तूं आमच्या अंतःकरणाच्या ठायीं वास करितोस. आमच्या अंतर्यामींचे विचार मनुष्यांस जरी समजले नाहींत, तथापि तुजला समजतात. आमचें अंतःकरण तूं यथावत् जाणतोस. तूं आतां आहेस, तूं पूर्वीं होतास. ज्या वेळेस मनुष्यांची उत्पत्तिही नव्हती, पृथ्वी ही घोर अरण्यमय होती, त्यावेळेस तूं

होतास, आणि अनंतकाळपर्यंत तूं रहाशील. यद्यपि हे सर्व जड पदार्थ तुजपासून भिन्न आहेत, तथापि तूं त्यांच्याठायीं वास करितोस. तुझे भक्त तुला चंद्रसूर्याच्याठायीं, आकाश-मंडलामध्यें विस्तीर्ण सागराच्याठायीं, अति उच्च पर्वतांमध्यें सर्वत्र तुझें सुंदर उन्नत स्वरूप पाहून आनंदानें परिपूर्ण असे होतात.

अपहतपाप्मा—तूं मंगलस्वरूप आहेस. तूं पवित्र आहेस. सत्य हें तुझें स्वरूप आहे. आम्हीं ज्यास सत्य असें म्हणतों, योग्य, शुभ, अथवा बरें असें म्हणतों, तें सर्वथा बाधरहित आहे. तें मनुष्याच्या इच्छेवर अवलंबून नाहीं. इच्छा असो किंवा नसो, तेणेंकरून लौकिक हित होवो अथवा अहित होवो, त्या सत्याचें अवलंबन केलेंच पाहिजे. अशा प्रकारचा त्याज-विषयीं आमच्या मतीचा ग्रह होतो. कारण, तूं जसा शाश्वत, सनातन, तसें तें सत्य तुझें स्वरूप म्हणून शाश्वत आणि स-नातन आहे. मनुष्यांच्या व्यवहारामध्यें उत्तरोत्तर सत्याची अधिकाधिक प्रवृत्ति तूं करीत आहेस. यद्यपि कांहीं काळप-र्यंत असत्याचा जय झाला तथापि अंतीं सत्याचाच जय हो-णार. भाग्यशाली तुझे कांहीं भक्त मोठमोठालीं संकटें सो-सून प्राणनाशाविषयींही क्षति न बाळगितां तुझें सत्य घट्ट

धरून बसतात. त्याच्या योगें त्यांच्या अंत:करणास जें सामर्थ्य प्राप्त होतें तें अन्य कशाच्या योगेंही मिळावयाचें नाहीं. जो मनुष्य कामक्रोधादिकांचा दास, ज्याच्या अंत:करणामध्यें दुष्ट वासना नांदतात, त्याला तुझ्या मंगलस्वरूपाचें ज्ञान व्हावयाचें नाहीं. तुझ्या पवित्र मंदिराच्याठायीं प्रवेश करण्याचा अधिकार त्याजला नाहीं. पापाविषयीं लाज वाटून जो अनुतप्त होतो, तोच तुजप्रत येण्याविषयीं योग्य होतो. असा जो मंगलमय सत्यस्वरूप परमात्मा तूं त्या तुजला आह्मीं पापी असत्यामध्यें नांदणारे असे प्राणी नमन करितों.

आनन्दो ब्रह्म— तूं आनंदस्वरूप आहेस. सर्व ह्या विश्वामध्यें आनंदमय असें तुझें स्वरूप नांदत आहे. दुष्ट वासना नाहींशी होऊन ज्याचें अंत:करण विमल झालें आहे त्याला तुझ्या आनंदमय स्वरूपाचा साक्षात्कार होतो. तुझे भक्त चोहींकडे तुझें आनंदमय स्वरूप पाहून कृतार्थ होतात. विषयसौख्यामध्यें आनंद नाहीं, सर्व पृथ्वीच्या ऐश्वर्यभोगामध्येंही आनंद नाहीं. हे सर्व क्षुद्र आनंद क्षुद्र मनुष्यांच्याच योग्य. सर्व ब्रह्मांडाचा अधिपति जो तूं सर्वांचा व्यापक, सर्वांचा वत्सल पिता, त्या तुझें स्वरूप ध्यानीं आणून तुझ्या समागमानें वागणें ह्यांतच खरा आनंद; ह्यापुढें अन्य सर्व आनंद तुच्छ होत.

**पितासि लोकस्य चराचरस्य**–तूं आमचा पिता, तूं आमची वत्सल माता, तूं आमचा सुहृत्, तूं आमची गति. प्रपंचामध्यें अनेक प्रकारचे त्रास, अनेक प्रकारच्या भीति, ह्यांतून आमचा उद्धार करणारा तूंच. तुजशिवाय, हा प्रपंच भयंकर श्वापदांनीं घेरलेल्या अरण्याप्रमाणें आहे. तुझ्या ठायीं विश्वास उत्पन्न झाला, अंतःकरणामध्यें तुझा स्थिर वास झाला, सदा सर्वकाळ मनुष्य तुजला पाहूं लागला, ह्मणजे ह्या अरण्याची भीति नष्ट होऊन तें सुंदर आनंदकारक उपवन असें होतें आणि मनुष्याच्या अंतःकरणांत धैर्य, आनंद आणि शांति वास करितात. आंत कामक्रोधादिकांपासून अंतःकरण पीडित होतें; बाहेर अनेकविध अनिष्ट गोष्टी घडून येतात; अशा स्थितीमध्यें अंतःकरण स्थिर ठेवणें, विवेकास अनुसरून चालणें, पापापासून दूर राहणें, शांति हृदयांत वागविणें, ही अत्यंत दुष्कर गोष्ट. परंतु तुझ्याठायीं अंतःकरण तत्पर राहिलें, तुझी सेवा केली, ह्मणजे विलक्षण प्रकारचें सामर्थ्य प्राप्त होऊन, त्या स्थितींतून मनुष्य पार पडतो. अतएव सर्व प्रकारें आमचा आधार तूं. आमच्या जीवाचा जीव तूं. आमचा रक्षण करणारा तूं. सर्व कांहीं आमचें तूंच. अनेक गुणांनीं विशिष्ट जो तूं त्या तुजला अनन्यभावें शरण येऊन आह्मीं लोटांगण घालितों.

याप्रमाणें ह्या ब्रह्मांडाचा कर्ता, त्याचा शासिता प्रभु, त्याचा रक्षणकर्ता, अज, शाश्वत, सनातन, ज्ञानस्वरूप, देशकालातीत, सर्वव्यापी, मंगलस्वरूप, सत्यस्वरूप, आनंदमय, आणि आमचा वत्सल मातापिता आणि आमचा सुहृत्, असा ज़ो परात्पर परमात्मा त्याचे ठायीं आपली मति क्षणभर स्थिर करूं.

(एथें कांहीं वेळ परमेश्वराच्या स्वरूपाचें ध्यान करून पुढील प्रार्थना ह्मणावी.)

**असतो मा सद्गमय तमसो मा ज्योतिर्गमय मृत्योर्मामृतं गमय आविराविर्म एधि ॥**

हे परमात्मन्, असत्य, आणि भ्रांति यांजमध्यें आह्मीं सतत वास करितों. आह्मीं अज्ञानरूप अंधकार, दुःखरूप अंधकार, पापरूप अंधकार यांणीं वेष्टित झालों आहों. त्या अंधकारांतून आणि असत्यांतून आह्मांस काढून, आपलें सत्य, आनंद आणि पवित्रता एतद्रूप जें तेज त्याच्या ठायीं आह्मांस ने. मृत्यूची जी ही दुर्निवार भीति, जिच्यापुढें सर्व विवेक नष्ट होऊन जातो, ती भीति नाहींशी कर. आपला साक्षात्कार ह्या दीनास होईल असें करून, सदैव आनंदमय, शांत, मंगलमय, गंभीर, अनादि, अनंत, परम सुंदर, वत्सल,

अशा तुझ्या स्वरूपामध्यें हा दीन आत्मा गुंग होऊन जाईल असें कर.

(त्या नंतर एक पद्य म्हणून धर्मविचारपर भाषण किंवा वाचन झाल्यावर एक पद्य म्हणावें आणि त्या समयास व आपल्या अंतःकरणाच्या वृत्तीस अनुरूप अशी विशेष प्रार्थना करणें असेल ती करावी.)

## आशीर्वचन.

सर्वसमर्थ परमात्मा आमचा वत्सल मायबाप आह्मीं मंदमतीनें केलेली ही आराधना मान्य करो. आपल्या ठायीं आमचें प्रेम उत्तरोत्तर दृढ होईल असें करो. कामक्रोधादिकांचें आकलन करण्याचें सामर्थ्य आह्मांस देवो. अंतःकरणामध्यें आपलें स्वरूप अधिकाधिक स्पष्टपणें आविर्भूत करो. त्याचीच इच्छा प्रमाण मानून सर्व कर्तव्यें निश्चयानें करण्यास आह्मांस सामर्थ्य देवो. आणि विवेक, धैर्य, आणि शांति हृदयांत वास करितील असें करो.

**समाप्त.**

# ह्या पुस्तकांतील कठीण शब्दांचा कोश.

**अ**

**अकृत्रिम**—ज्यांत कपट नाहीं
असें. [ण्यास कठीण.

**अगम्य**—प्राप्त होण्यास, समज-

**अगाध**—ज्याची खोली समजत
नाहीं तें.

**अगोचर**—इंद्रियांनीं जें समजत
नाहीं तें, दिसत नाहीं तें.

**अचिंत्य**—ज्याची कल्पना क-
रतां येत नाहीं तें.

**अचेतन**—जड. ज्यास जीव
नाहीं तें.

**अतएव**— ह्मणून.

**अतर्क्य**—तर्क करण्यास कठीण.

**अतिक्रम**—मर्यादे बाहेर जाणें.

**अतीत**—पलीकडे.

**अधम**—नीच.

**अनन्यभाव**—एकाच देवावर वि-
श्वास ठेवणें.

**अनादि**—ज्यास आरंभ नाहीं तो

**अनाद्यनंत**—ज्यास आरंभ व
शेवट नाहीं तें.

**अनुपमेय**—ज्यास कशाची उप-
मा देतां येत नाहीं तें.

**अनुराग**—प्रीति.

**अनुल्लंघ्य**—ज्याचें उल्लंघन क-
रतां येत नाहीं तें. [झालेलें.

**अपापविद्ध**—पापानें दूषित न

**अपेक्षित**—इच्छिलेलें.

**अबाधित**—ज्यास बाध नाहीं तें.

**अमृतधाम**—अमरपणाचें घर.

**अमृतस्वरूप**—अमर आहे स्व-
रूप ज्याचें. [धार.

**अवलंबन**—आश्रय करणें, आ-

**अव्यय**—ज्यास विकार नाहीं तें.

**अशुचिता**—अपवित्रपणा.

**अश्लाघ्य**—स्तुति करण्यास अ-
योग्य, निंद्य.

**अस्तित्व**–असणें.

**आ.**

**आकलन**–आकळणें.
**आकृष्ट**–ओढलेलें.
**आतुर**–अधीर, उतावीळ.
**आदर्श**–आरसा.
**आदेश**–आज्ञा.
**आध्यात्मिक**–आत्म्यासंबंधीं.
**आपदा**–संकट, दुःख.
**आपाततः**–वरवर.
**आसक्त**–अत्यंत लुब्ध झालेलें.
**आज्ञानुवर्ती**–आज्ञेप्रमाणें वागणारें.
**आज्ञांकित**–आज्ञा पाळणारें.

**उ.**

**उचित**–योग्य.
**उच्च**–उंच.
**उत्कंठित**–उताविळ.
**उत्पात**–प्रळय. नित्य न होणारी भयंकर गोष्ट.
**उत्पादक**–उत्पन्न करणारा.
**उदित**–उदय पावलेलें.
**उद्बोधन**–जागृत करणें.
**उद्भूत**–उत्पन्न झालेलें.
**उद्विग्न**–खेदयुक्त, उदासीन.
**उन्नत**–उत्तम स्थितीस आलेलें.
**उन्नति**–उत्तम स्थिति.
**उपस्थित**–जवळ असलेलें.
**उल्हसित**–प्रफुल्लित.

**ए.**

**एतदर्थ**–यासाठीं.

**ऐ.**

**ऐहिक**–ह्या जगासंबंधीं.

**औ.**

**औत्सुक्य**–उत्सुकता.

**अं.**

**अंजन**–डोळ्यांत घालण्याचें औषध.
**अंतराय**–विघ्न.
**अंतर्निहित**–आंत असलेलें.
**अंतर्यामित्व**- } अंतःकरणांत
**अंतरात्मत्व**- } वास करण्याचा गुण.

क.

कल्याणगुणनिधान— कल्याण-
कारक गुणांचें स्थान.

ग.

गोचर—इंद्रियांनीं जाणण्यासा-
रखें, दिसत असलेलें.

च

चरित—चरित्र.

चाड—सवड, गरज.

चिदात्मक— } ज्ञानस्वरूप.
चिन्मय— }

चेतन—ज्यास प्राण आहे तें.

चेतना— बुद्धि.

चैतन्य - ज्ञानशक्ति.

चैतन्यमय—ज्ञानमय.

च्युत—सुटलेलें, पडलेलें.

ज.

जगज्जननी—जगाची माता.

जगज्जिवन—जगताचा प्राण.

जगत्कारण—जग उत्पन्न कर-
णारा.

जगदात्मन्-हे जगाच्याआत्म्या,

जीवित—जगणें, आयुष्य.

झ.

झंझावात—तुफान वारा.

ठ.

ठाकलों—राहिलों.

त.

तत्ववेत्ता—खरें काय तें जा-
णणारा.

तल्लीन—त्या ठिकाणीं गुंग [झालेलें.

तिमिर—अंधकार.

त्वदभावीं—तूं नसतां.

द.

दिव्य—उत्तम, तेजस्वी.

दिव्यभाव—देवपणा, वर्चस्व.

दुरित—पाप.

दुर्ग—जेथें प्रवेश होण्यास कठी-
ण तें, किल्ला.

दुर्घट—होण्यास कठीण.

दुर्वृत्त-वाईट आचरणकरणारें.

दु:साध्य—साधण्यास कठीण.

दृढानुराग—दृढ प्रीति. [जोगें.

दृश्यमान—दिसणारें, दिसण्या-

**ध.**

**धन्य**–प्रशंसनीय.

**न.**

**नष्टप्राय**--नाहींसें झाल्यासारखें.
**नानाविध**–अनेकप्रकारचें.
**नियमन**- व्यवस्था.
**नियामक**– } व्यवस्था करणारा.
**नियंता**– }
**निवृत्त**–परतलेलें.
**निर्नायक**-ज्यास कोणी धनी नाहीं असें.
**निर्मूलन**–मुळासकट नाहींसें करणें.
**निःसीम**–ज्याला सीमा नाहीं तें

**प.**

**पटल**–पडदा.
**पतन**–पडणें.
**पतित**–पडलेला, पापी.
**पराजित**–पराजय पावलेला.
**परित्राता**–सोडविणारा.
**पर्यवसान**–शेवट.
**पारत्रिक**–परलोकाविषयींचें.
**पारमार्थिक**–ईश्वरप्राप्तीसंबंधीं.
**पावन**–पवित्र करणारा.
**पितृवात्सल्य**–पित्याचें प्रेम.
**प्रत्यय**–अनुभव, दाखला.
**प्रफुल्लित**–उमललेलें, टवटवलेलें.
**प्रभव**–उत्पत्ति, उगम.
**प्रवृत्त**–तिकडे मन ओढलेलें.
**प्राबल्य**–जोर, बळ.
**प्रेमभरित**–प्रेमानें भरलेलें.

**ब.**

**बाणणें**–भिनणें, आंगांत भरणें.
**बाह्य**–बाहेरचें.
**बोधज्योति**–बोध हीच कोणी ज्योति, ज्ञानज्योति.

**भ.**

**भातुकें**–खाऊ.

**म.**

**मनोभावना**– } मनाची वृत्ति.
**मनोवृत्ति**– }
**मर्त्य**- मरणारें.
**मुक्तिप्रद**–मुक्ति देणारें.
**मूढ**–अज्ञान.

मोहपाश–मोहाचा फासा.
मंगलमय–कल्याणानें भरलेलें.

र.

रंक–भिकारी, क्षुल्लक.

व.

वत्सल–मायाळू.
वाड– मोठा, थोर.
वातावरण–वायूचें वेष्टन.
विकसित-फुललेलें, उमललेलें.
विनीत–नम्र.
विविध–नानाप्रकारचें.
विवेक–सदसद्विचार.
विवेचन–विचार.
विषयलोभ–संसार सुखाची इच्छा.
विस्मय– आश्चर्य.
विक्षिप्त–वेडें.
व्यग्र–स्थिर नव्हे तें.
व्यवसाय–उद्योग, व्यापार.
व्यावृत्ति–फेरा.

श.

शलाका–सळई.
शाब्दिक– शब्दाचें.
शांतस्वरूप–शांति हेंच ज्याचें स्वरूप आहे तें.
शांतिजन्य–शांतीपासून उत्पन्न झालेलें.
शिरसावंद्य–ज्यापुढें मस्तक नम्र करावें इतकें योग्य तें.
शोकाक्रांत–शोकानें भरलेलें.
शोचनीय-दुःख मानण्यासारखें.

स.

सच्चिदानंद–सत्, चित्, आणि आनंद–सत्य, ज्ञान, आणि आनंद हीं ज्याचीं रूपें आहेत असा परमेश्वर.
सनातन–फार काळापासून चालत आलेलें.
सन्निधान– जवळ असणें.
सप्रयोजन–हेतु धरून.
समदर्शी–सारखी दृष्टि ठेवणारा.
सर्वथा–सर्व प्रकारें.
सर्वत्र–चोहींकडे.
सर्वव्यापक- / सर्वव्यापि– } सर्व ठिकाणीं असणारें.

सर्वांतर्यामि–सर्वांच्या अंतःकरणांत असणारा.

सलग्न–फार जवळ.

सादर–आदरानें.

सुखधाम–सुखाचें घर.

सुप्रतिष्ठित–चांगलें ठरलेलें, स्थिर झालेलें. [हाट.

सुप्रभात–सुखदायक अशी प-

सुरम्य–सुंदर.

सुहृत–आप्त, मित्र.

सूर्यमाला–सूर्या सभोंवती फिरणारे ग्रह यांची माळ.

सोज्वळ–निर्मळ, स्वच्छ.

संचित–साठविलेलें.

संभजनीय–भजण्यास योग्य.

संशयजाल–संशयाचें जाळें.

स्तोत्र–स्तुति.

स्थिरचर–स्थावर व जंगम.

क्ष.

क्षति–लाज, शंका, हानि.

क्षुद्रता–क्षुल्लकपणा.

क्षुद्ररूपी–क्षुल्लक स्वरूपाचें.

ज्ञ.

ज्ञानस्वरूप–ज्ञान हेंच ज्याचें स्वरूप आहे तो.

## एथील प्रार्थनासमाजाची ... पुस्तकें.

| | | | |
|---|---|---|---|
| कीर्तनें प्रश्नोत्तर .. .... ........ | ० | १ | ० |
| ए ... आराधनेचा प्रकार .... . | ० | १ | ० |
| ... शिक्षा ........ ...... .... | ० | [illegible] | ० |
| ब्राह्मधर्मप्रतिपादक वाक्यसंग्रह .. ...... | ० | | ० |
| प्रार्थनासंगीत (निरनिराळ्या बांधणीचें) ४ आणे, ५ आणे, ६ आणे. | | | |
| भक्तिसुधा .... .... .......... ....). | ० | ६ | |
| ... ... ... ह्यांविषयीं ... रा. रा. काशीनाथ बाळकृष्ण ... केलेलें.... ....... ... ........ | ० | [illegible] | ० |
| Last days of Raja Rammohan Ray. Rs. | 1 | 0 | [illegible] |
| The *Rishi* an English poem by Prof. M. M. Kunte B. A. ... . ... ,, | 0 | 6 | 0 |
| What relation does Religion bear to Civilization? ... .. .. .... ,, | 0 | [illegible] | [illegible] |
| Memoir of late Dr. Carpenter , | 1 | 0 | 0 |
| Practical Sermons of Dr. Carpenter ,, | 0 | 12 | 0 |
| The New Dispensation and the Sadharan Brahma Samaj by Pandit Shiwa Nath Shastree M. A. ... .. ........ ,, | 0 | 8 | |
| Faith and Progress of the Brahma Samaj by Babu P. C. Mazumdar | [illegible] | 2 | 0 |
| ... of Theism and its relation to ... called revealed religions. ,, ... Prof. R.G. Bhandarkar M.A. , | [illegible] | [illegible] | 0 |